**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# अचिंत्य

वर्तमानात घेतलेल्या एखाद्या निर्णयाचे भविष्यात नेमके कोणते परिणाम कसे व कधी होणार आहेत, याचा फारसा अंदाज कोणाला कधीच येत नसतो. मानवी शक्तीबुद्धीची ती नैसर्गिक आणि स्वाभाविक मर्यादाच होय. निर्णय जरी एखादी व्यक्ती अगर संस्था घेत असली तरी त्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर भवतालचे जग त्या निर्णयाची व्यवहारातील त्या वेळची जी निष्पत्ती असेल तिला नेमका कोणता प्रतिसाद केव्हा देईल, याची काहीही अटकळ बांधता येत नसते. भवतालातून उद्भवणाऱ्या प्रतिसादानुसार पुढील परिणामांची साखळी उलगडत जाते. आपला सगळा लोकव्यवहार याच पद्धतीने साकारत असतो. साहजिकच, जो काही निर्णय आपण घेतो आहोत त्याचे, आपल्या शक्तीबुद्धीच्या आवाक्यात त्या वेळी जागणारे, भविष्यकालीन संभाव्य परिणाम अजमावत त्या निर्णयाची अंमलबजावणी आपण सुरू करतो. परंतु, अनेकदा असेही घडते की, एखादा अतिशय मोठा निर्णय घेतेवेळी त्या निर्णयाचे सुदूर भविष्यातील जे भलेबुरे संभाव्य परिणाम निर्णयकर्त्यांने गृहीत धरलेले असतात अथवा अंदाजित केलेले असतात त्यांपेक्षा अगदी निराळे, अनपेक्षित, अचिंत्य, अकल्पित असेच पडसाद समाजव्यवहारात उमटतात. भविष्यकाळात साकारणाऱ्या अशा त्या अकल्पित, अचिंत्य व अहेतूक परिणामांचा तत्कालीन परिमाणे इतकी उत्पातक असतात की संबंधित निर्णय घेणारी व्यक्ती अगर संस्थात्मक यंत्रणा त्या वेळी तिथे उपस्थित असेल तर हतबुद्ध होऊन कपाळावर हात मारण्याखेरीज तिच्या हातात तेव्हा काहीच उरलेले नसते. ‘जागतिकीकरण’ नामक एका जगड्व्याळ घटनासाखळीची उत्पत्ती ज्या वेळी ज्या कोणा एक अगर एकापेक्षा अधिक व्यक्ती किंवा/आणि संस्थेच्या निर्णायक कृतीद्वारे गतिमान बनली असावी ती/त्या व्यक्ती अगर संस्था आज हयात असतील तर कपाळावर हात मारून घेण्यापेक्षा काही वेगळी प्रतिक्रिया त्यांच्याकडून उमटलीच नसती. देशोदेशींच्या बाजारपेठांच्या सघन गुंफणीद्वारे उत्पन्न झालेले व होत असलेले आर्थिक व भौतिक लाभ कमी-अधिक प्रमाणात चाखणारा वैश्विक समुदाय आज नेमका तसाच दिङ्मूढ झालेला दिसतो आहे.

जागतिकीकरणाच्या माध्यमातून उत्पन्न होणारे आर्थिक व व्यापारी लाभ पदरात पाडून घेण्यासाठी उदारीकरणाच्या पर्वाला आरंभ करणाऱ्या सगळ्यांच देशांना, भविष्यात आपल्याला एका अतिशय संकुचित, विद्वेषकारी व सामाजिक सौहार्दाची वीण विसविशीत करून टाकणाऱ्या विघातक प्रवृत्तींचा सामना करावा लागणार आहे, याची पुसटशीदेखील कल्पना आली नसावी. युरोपीय समुदायाच्या संसदेसाठी अगदी अलीकडेच झालेल्या निवडणुकांदरम्यान युरोपीय समुदायातील विविध देशांमध्ये अति उजव्या विचारसरणीच्या शक्तींना जो वाढता पाठिंबा व्यक्त झाला तिने देशोदेशींच्या सुबुद्ध, संवेदनशील व विधायक वृत्ती-प्रवृत्तींना एक जोरदार हादराच दिला. जागतिकीकरणाला उमटलेल्या या अगदी अकल्पित, अचिंत्य आणि तितक्याच विघातक प्रतिसादाची जडणघडण युरोपीय समाजमानसात आजवर कशी घडत आली तिचा या अंकात घेतलेला मागोवा वाचनीय ठरावा.

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारासंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# विज्ञान

## मंगळावरील वास्तव्याची तयारी?

ज्येष्ठ शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग्ज यांनी आपल्या एका मुलाखतीत अगदी स्पष्टपणे सांगितलेले होते की, या पृथ्वीवर मानवजातीला इथून पुढे फार काळ वास्तव्य करता येईल असे वाटत नाही. जेमतेम आणखी १०० वर्षे आपण या पृथ्वीतलावर राहू शकू अशीच शक्यता असल्याने आपल्याला नव्या पर्यायांचा शोध घ्यावा लागणार आहे. त्यांचे हे विधान खूप गाजले होते आणि त्यावर उलटसुलट चर्चादेखील सुरू झाल्या. अनेकांनी हे विधान गांभीर्याने घेतले आणि त्यांनी उद्याचा विचार सुरू केला आहे. आपण चंद्रावर जाऊ शकतो त्याप्रमाणे मंगळ ग्रहावरसुद्धा जाऊन तिथे राहू शकतो का, हा विचार तिथूनच सुरू झाला आणि त्या दिशेने संशोधनही वेगाने सुरू झाले. मंगळावर वसाहत स्थापन करण्याची कल्पनाही जोर धरू लागली आणि तिला आणखी पाठबळ मिळाले ते क्रांतिकारी कल्पना वास्तवात आणण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या SpaceX कंपनीचे प्रमुख Elon Musk यांच्या विधानामुळे. त्यांनी एका जाहीर मुलाखतीत सांगितले होते की, येत्या ३० वर्षांमध्ये पृथ्वीव्यतिरिक्त मंगळावर मानवी वस्ती झालेली असेल. या विषयी अनेक मतमतांतरे असली तरीदेखील Elon Musk मात्र ही गोष्ट वास्तवात नक्की उतरणार हे गृहित धरून असल्याने त्यांनी १० लाख लोकांना मंगळावर नेण्याचा 'गेम प्लॅन'सुद्धा तयार केलेला आहे. त्यासाठी 'Star Ship' या जगातील सर्वात मोठ्या रॉकेटची उभारणीही केली जात असून त्यातून लोकांना मंगळावर नेणे शक्य होईल अशी Elon Musk यांची योजना आहे.

मंगळावर वस्ती असावी ही शक्यता एकोणिसाव्या शतकापासून चर्चेत आली. मंगळ ग्रहाची छायाचित्रे पाहताना कालव्यासारख्या रचना दिसल्याने तिथे सजीवसृष्टी असावी असा दावा अनेकांनी केला. त्या शक्यतेचा विचार करून अनेक साहित्यकृती लिहिल्या गेल्या. चित्रपट आणि दूरचित्रवाहिन्यांवरच्या मालिकाही साकारल्या. दुसऱ्या

महायुद्धानंतर तर अवकाशमोहिमांची जी स्पर्धा सुरू झाली त्यात मंगळमोहिमांवर भर राहिला. मंगळ ग्रहाबाबत अधिकाधिक जाणून घेण्यासाठी अनेक अंतराळ मोहिमा जगभरातील अनेक देशांनी राबवल्या. भारताची यशस्वी मंगळयान मोहिम, पृथ्वीवरून मंगळ ग्रहाची केलेली निरीक्षणे, 'Hubble' दुर्बिणीच्या माध्यमातून या ग्रहाची टिपलेली छायाचित्रे, विविध मंगळ मोहिमांमध्ये ग्रहावर प्रत्यक्ष उतरून स्वयंचलित वाहनांनी तिथे केलेले शोधकार्य व तिथून पाठवलेली छायाचित्रे आणि निरीक्षणे, मंगळाभोवती फिरणारे विविध देशांचे उपग्रह... या सगळ्यांतून खूप माहिती हाताशी आलेली आहे. मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले त्यालाही पन्नास वर्षांहून अधिक काळ आता लोटलेला आहे. परंतु तिथे जाऊन राहावे असे वातावरण नसल्याने चंद्रावर जाऊन राहण्याचा विचार कुणी केला नाही. मंगळाच्या तुलनेत शुक्र ग्रह पृथ्वीच्या अधिक जवळ असला तरी तो सूर्यालाही जवळ असल्याने पृथ्वीच्या वातावरणापेक्षा तिथे किती तरी अधिक पटीने कार्बन डाय ऑक्साईड आणि सल्फर डाय ऑक्साईड हे वायू असल्यामुळे शुक्रावरचे वातावरण सजीवसृष्टीसाठी पोषक नाही. त्या तुलनेत, मंगळ ग्रह पृथ्वीपासून शुक्राच्या तुलनेत दूर असला तरी त्याचे सूर्यापासूनचे अंतर सरासरी २२ कोटी किलोमीटर इतके आहे. त्यामुळे तिथे सजीवसृष्टी राहू शकेल असा शास्त्रज्ञांचा कयास आहे.

मंगळाचा पृष्ठभाग पृथ्वीच्या पृष्ठभागासारखाच आहे. तेथील वातावरण विरळ आहे. तिथेही दगड, माती, डोंगर आहेत. त्यामुळे तेथील वातावरणाशी जुळवून घेता आले तर भविष्यात तिथे मानवी वस्ती होऊ शकते असा विचार शास्त्रज्ञांच्या मनात आला व त्या दिशेने संशोधन सुरू झाले. अलीकडच्या काळात अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात होत असलेली लक्षणीय प्रगती आणि अंतराळ मोहिमांमुळे रुंदावलेल्या कक्षा यामुळे अवकाश संशोधक आता केवळ मंगळावर जाण्याचाच नाही तर भविष्यात तिथे जाऊन राहण्याचाही विचार करू लागले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून National Aeronautics and Space Administration (NASA-नासा) या अमेरिकी अवकाश संशोधन संस्थेने त्यासाठी एक मोहिमच हाती घेतली आहे. मंगळावर राहण्याची वेळ आली तर काय करावे लागेल याचा अभ्यास करण्यासाठी 'नासा'च्या चार शास्त्रज्ञांनी चक्क एक महिना 'प्रति मंगळा'वर वास्तव्य केलेले होते. 'नासा मार्स मिशन' या नावाने हा प्रयोग करण्यात आला.

**प्रयोगांसाठी निर्मिती 'प्रति–मंगळा'ची**

जागतिक स्तरावर घडून येत असलेले हवामानबदल किंवा अन्य कोणत्याही

कारणांनी, समजा, उद्या पृथ्वीवर राहणे अगदी अशक्यच झाले तर मंगळ ग्रहावर जाऊन राहता येऊ शकेल का, याच्या शक्यता देशोदेशीचे शास्त्रज्ञ आता अजमावत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून, मंगळावर निवास करायचा झालाच तर भविष्यात कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या ठरतील, त्यासाठी माणसाला कोणती कौशल्ये नव्याने शिकावी लागतील, पृथ्वी ते मंगळ हा प्रवास कशा पद्धतीने सुलभ व सुसह्य करता येऊ शकेल, तिथल्या कठीण परिस्थितीशी कशा रीतीने जुळवून घेता येईल... अशांसारख्या विविध प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यांवरील संभाव्य उत्तरे शोधण्यासाठी 'नासा'च्या चार शास्त्रज्ञांनी एक महत्त्वाचा प्रयोग अलीकडेच केला. हा प्रयोग करण्यासाठी तयारीही जय्यत केलेली होती. इथून मंगळावर जाऊन अभ्यास करण्याऐवजी चक्क मंगळच पृथ्वीवर आणण्याची हिकमत त्यात साकारण्यात आली. त्यासाठी अमेरिकेच्या टेक्सास राज्यातील ह्यूस्टन येथे कार्यरत असलेल्या NASA Johnson Space Center मध्ये चक्क मंगळावर जसे वातावरण आहे तशा वातावरणाची निर्मिती करण्यात आली. मंगळ ग्रहावर आहे तसेच वातावरण आणि भूभागही तिथे तयार करण्यात आला. अशा प्रकारे, शास्त्रज्ञांना संशोधनासाठी तसेच प्रयोगांसाठी एक 'प्रति मंगळ'च जणू निर्माण करण्यात आला. संगणकतज्ज्ञ Nathan Jones, सूक्ष्मजीवशास्त्राचे विशेषज्ञ Anca Selariu, संशोधक शास्त्रज्ञ Kelly Haston आणि अभियंते Ross Brockwell असे चार शास्त्रज्ञ त्या 'प्रति-मंगळा'वर वर्षभर वास्तव्यास राहिले. या कृत्रिम मंगळावर राहून या शास्त्रज्ञांनी अवकाशातील मंगळावर कशी परिस्थिती असू शकेल याचा बारकाईने अभ्यास केला.

'प्रति-मंगळा'वरील वास्तव्यादरम्यान शास्त्रज्ञांनी अनेकानेक प्रयोग केले. टोमॅटोची लागवड करण्याचा यशस्वी प्रयोग त्यांनी तिथे केला. त्याचप्रमाणे मंगळावर आपण राहायला गेलो तर तिथे चालायचे कसे, यंत्रसामुग्रीचा वापर कसा करायचा, समजा पृथ्वीशी संपर्क तुटलाच तर तशा परिस्थितीत काय करायचे, तशाही परिस्थितीत तिथे कसे राहायचे, प्रसंगोपात्त उद्भवणारी यंत्रांची दुरुस्ती कशी करायची... अशांसारख्या अनेकानेक गोष्टींवरचे प्रयोग त्यांनी करून पाहिले. 'नासा'मध्ये असणारे इतर संशोधक या चमूच्या सातत्याने संपर्कात होते आणि मानवनिर्मित 'प्रति-मंगळा'वरील परिस्थितीशी ते कसे जुळवून घेत आहेत याची निरीक्षणे नोंदवत होते. निरीक्षणांती हाती आलेल्या माहितीचे संकलनही केले जात होते. त्याचप्रमाणे, 'प्रति-मंगळा'वर वास केलेल्या शास्त्रज्ञांच्या शारीरिक व मानसिक स्थितीवर वर्षभराच्या त्या कालावधीदरम्यान नेमका काय परिणाम होत राहिला, याचाही

अभ्यास बाहेरील शास्त्रज्ञांनी केला. मंगळ ग्रहावर राहायचे तर तिथे उभे करावे लागणारे अधिवास हे अत्याधुनिक अशा 'थ्री डी प्रिंटिंग'च्या तंत्रशास्त्राचा वापर करून निर्माण करावे लागतील असे शास्त्रज्ञांच्या प्रकर्षाने ध्यानात आले. मंगळावर अधिवास उभारण्यासाठी लागणारी बांधकामसामुग्री लाखो किलोमीटर अंतरावरून वाहून नेणे अशक्यप्रायच असल्यामुळे 'थ्री डी प्रिंटिंग'च्या तंत्रज्ञानाचा वापर करूनच तिथे निवास सुविधा निर्माण कराव्या लागतील.

मंगळ ग्रहावरील वातावरणाशी जुळवून घेणे पृथ्वीवासियांना खूप कठीण जाईल, असे शास्त्रज्ञांचे अनुमान आहे. मंगळावरील वातावरणाशी साधर्म्य असणारा अधिवास मानवनिर्मित 'प्रति-मंगळा'वर उभारण्यात आल्याने अवकाशातील मंगळावर वास करण्याच्या अनुभवाला जवळपास थेट भिडणे शास्त्रज्ञांच्या लेखी सोपे ठरले. उद्या खरोखरीच मंगळावर राहण्याची वेळ आली तर काय करावे लागेल आणि कोणती पूर्वतयारी सज्ज ठेवावी लागेल याचा अंदाज शास्त्रज्ञांना या प्रयोगातून नक्कीच आला. अंतराळात टिकू शकतील अशाच पद्धतीचे अन्नपदार्थ शास्त्रज्ञांनी आपल्यासमवेत घेतलेले होते. ते त्यांनी 'प्रति-मंगळा'वर वर्षभर टिकवून, पुरवून खाल्ले. पृथ्वी आणि मंगळ या दोन्ही ग्रहांमधील अंतर लक्षात घेता परस्परसंवाद आणि समन्वय साधण्यासाठी जो काळ जाईल तो सुद्धा शास्त्रज्ञांनी प्रयोगांती अभ्यासला. त्यानुसार, मंगळावरून पृथ्वीवर एखादा संदेश पाठवायला आणि त्याचे उत्तर मिळवायला ४५ मिनिटांचा कालावधी लागतो आहे, असे त्यांच्या लक्षात आले. या सगळ्या प्रयोगातून, भविष्यात मंगळावर वस्ती करण्याची कल्पना वास्तवात उतरविण्याच्या दिशेने करण्याच्या प्रवासासाठी आणखी बळ मिळालेले आहे. ती कल्पना वास्तवात अवतरण्यासाठी बराच काळ जाणार असला तरी त्यांमुळे या प्रयोगाचे महत्त्व कमी होत नाही.

# सामाजिक

# पालकांसाठी (कोरियन) 'आनंदाचा कारखाना'

वेगवान आर्थिक व भौतिक विकास होण्याच्या दिशेने सगळीकडेच एक अनाकलनीय घोडदौड सुरू आहे. परंतु, तिचा विपरित परिणाम म्हणून मानसिक स्वस्थता मात्र घाऊक प्रमाणावर हरवत चालली आहे आणि त्यामुळे विविध प्रकारच्या ताणतणावांनादेखील आज आपल्या सगळ्यांनाच कमी-अधिक प्रमाणात सामोरे जावे लागते आहे. धकाधकीच्या, स्पर्धामय, ताणतणावांनी वेढलेल्या या रोजच्या जीवनातून बाहेर पडून स्वत:कडे त्रयस्थपणे पाहणे, स्वत:मध्ये डोकावणे नितांत गरजेचे बनत चालले आहे. मात्र त्यासाठी आवश्यक असणारा पुरेसा वेळ काही काढता येत नाही आणि एक वेळ तसा निवांतपणा मिळाला तरी हवा तसा संपूर्ण एकांतही लाभत नाही. जगभरात आज जवळपास सगळीकडेच ही परिस्थिती दिसून येते. या सगळ्याचे परिणाम मन:स्वास्थ्यावरच केवळ नव्हे तर परस्परनातेसंबंधांवरही होत आहेत. या जटिल समस्येवर उतारा शोधण्याचे निकराचे प्रयत्नही दुसरीकडे चालू आहेत.

या समस्येवर उपाय म्हणून दक्षिण कोरियामध्ये एक आगळावेगळा प्रयोग साकारलेला आहे. 'आनंदाचा कारखाना' अर्थात् 'हॅपिनेस फॅक्टरी' हे त्या अभिनव उपक्रमाचे नाव! एकांतवासाची सुविधा या प्रयोगाद्वारे लोकांना उपलब्ध करून दिली जाते. त्याला उदंड प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. केवळ युवक आणि/अथवा महिलाच नव्हे तर, आपल्या पोटच्या मुलांना अधिक चांगल्या रीतीने समजून घेता यावे यासाठी दक्षिण कोरियावासी अनेक आई-वडीलदेखील जाणीवपूर्वक बंद खोल्यांमध्ये एकट्याने राहण्यासाठी पुढे येत आहेत. सर्व प्रकारच्या 'डिजिटल' माध्यमांपासून स्वत:ला दूर ठेवून, बाहेरच्या जगाशी सर्व प्रकारचा संवाद-संपर्क खंडित करून अगर पूर्णपणे थांबवून एकांतवासाचा पुरेपूर अनुभव प्राप्त करून देणारी ही जागा म्हणजे 'आनंदाचा कारखाना'. एकांतवासात राहिल्याने मन शांत होईल

आणि स्वत:ला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेणे शक्य बनू शकेल, अशा आशेने या 'कारखान्या'ला भेट देणाऱ्या लोकांची संख्या उत्तरोत्तर वाढते आहे.

इतर अनेक देशांप्रमाणे दक्षिण कोरियामध्येही वेगाने आर्थिक प्रगती घडून आली आणि त्यातून आधुनिक सुखसोयींची रेलचेल येत गेली. अंकीय ('डिजिटल') माध्यमांनी अवघे भावविश्व व्यापून टाकले आणि माणूस आपल्या माणसांपासून व परस्परनातेसंबंधांपासून दुरावत गेला. परिणामी, व्यक्तिगत आणि कौटुंबिक पातळीवरील मानसिक अस्वस्थता आणि हरवत चाललेली शांतता अधिकच त्रासदायक ठरू लागली. रोजगार मिळण्यातील अडचणी, त्यांपायी उद्भवणारा आर्थिक स्थैर्याचा अभाव... यां सगळ्यांची परिणती ज्यात घडून येते असा परस्परनातेसंबंधातील ताणतणाव, व्यक्तिगत उत्कर्षातील अडचणी... या आणि अशा अनेक कारणांमुळे दक्षिण कोरियातील अनेक नागरिक या 'हॅपिनेस फॅक्टरी'मध्ये जाऊन शांतता व एकांत अनुभवण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. भौतिक जगापासून स्वत:ला जरा वेगळे केले तरच यातून आपण मार्ग काढू शकू, या आशेने येणाऱ्या युवकांची संख्या त्यांत तुलनेने अधिक आहे.

गजबजलेल्या बाहेरच्या जगापासून अलिप्त होऊन एकांतवासात राहणे आणि खऱ्या आनंदाचा, शांततेचा शोध घेणे म्हणजे 'हॅपिनेस फॅक्टरी'. 'हॅपिनेस फॅक्टरी' संकल्पनेची खरी सुरुवात झाली ती जपानमध्ये. Hikikomori हा जपानी भाषेतील शब्द तिथे योजला गेला. सगळ्या जगापासून आणि समाजापासून अलिप्त होणे, हा या शब्दाचा अर्थ. जपानच्या Health, Labour, and Welfare मंत्रालयाने ही संकल्पना व्यवस्थित विशद केलेली दिसते. Hikikomori म्हणजे असा एकांतवास की ज्या काळात जगातील कुणाशीही, कोणत्याही प्रकारचा संपर्क ठेवावासा वाटत नाही, अशी व्याख्या मंत्रालयाने मांडलेली आहे अथवा होती. आई-वडिलांसमवेत घरात राहावेसे वाटत नाही, कोणतेही शिक्षण घ्यावेसे वाटत नाही, अर्थार्जन करावेसे वाटत नाही, सामाजिक नीतीनियमांचे पालन न करता, कुणाशीही संवाद न साधता एकटेपणाने राहावेसे वाटते, अशी मानसिकता म्हणजे Hikikomori. अशा मानसिक अवस्थेचा हा कालावधी सहा महिन्यांपर्यंतचादेखील असू शकतो. परंतु, छिन्नमनस्कता ( स्किझोफ्रेनिया) किंवा नैराश्यापेक्षा (डिप्रेशन) Hikikomori ही गुणात्मकरीत्या वेगळी मानसिक अवस्था गणली जाते किंवा गणावी लागते, असे या अभ्यासशाखेतील संशोधकांचे प्रतिपादन आहे.

जपानमधील मानसशास्त्रज्ञांच्या मते अंकीय तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापरामुळे ही मानसिक अवस्था लोकांमध्ये वाढत चाललेली आहे. जपानच नव्हे तर इतर अनेक पुढारलेल्या आणि प्रगत देशांमध्ये तिचे प्रमाण वाढत चालले आहे. Hikikomori या अवस्थेतून जाणाऱ्या व्यक्तींचा समाजाशी असलेला संवाद हळूहळू कमी होत जातो. ती एकांतप्रिय बनत जाते. तिचे सामाजिक वर्तुळदेखील साहजिकच मग कमी होत जाते आणि आपली बंद खोली म्हणजेच जणू उभे विश्व असे मानून अशा व्यक्ती एकटे जगत राहतात. १९९०च्या दशकानंतर जपानमध्ये आणि त्या पाठोपाठ दक्षिण कोरियामध्ये अशा मानसिक अवस्थेतील नागरिकांची संख्या वेगाने वाढत असल्याचे अभ्यासकांच्या निदर्शनास आले. व्यक्तीच्या या अशा मनोवस्थेकडे एक 'मानसिक आजार' म्हणून जपानमध्ये पाहिले जाते. परंतु, दक्षिण कोरियातील हा 'आनंदाचा कारखाना' मात्र लोकांना खऱ्या आनंदाच्या जवळ घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो आहे. पुरती हरवलेली मन:शांती आणि त्यांपायी पारखा झालेला आनंद या एकांतवासाद्वारे पुन्हा एकवार हस्तगत व्हावा अथवा करता यावा, अशी या प्रयोगामागची मूळ संकल्पना आहे.

'हॅपिनेस फॅक्टरी'मध्ये प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येकाला एक छोटीशी खोली दिली जाते. बाहेरच्या भौतिक जगाशी कोणत्याही प्रकारे संपर्क येणार नाही याची दक्षता तिथे घेतलेली असते. ही खोली चारही बाजूंनी पूर्णपणे बंद असते. आत गेल्यावर बाहेरच्या जगाविषयी आतील व्यक्तीला काहीही कळणार नाही याची पुरेपूर दक्षता तिथे घेतलेली असते. एकदा खोलीत प्रवेश केल्यानंतर इतर कुणाशीही संवाद साधता येत नाही. दरवाजाला एक चौकोनी खिडकी केलेली असते जेवणाचे ताट सरकवण्यापुरती. तिला 'फीडिंग होल' असे म्हणले जाते. केवळ जेवणाचे ताट खोलीत सरकवण्यापुरतीच काय ती चौकट उघडते. अन्यथा, पूर्ण वेळ व्यक्ती केवळ स्वत:सोबतच असते. 'आनंदाच्या कारखान्या'त प्रवेश घेतल्यावर तिथे लॅपटॉप किंवा मोबाइल वापरण्याची परवानगी नसते. इतकेच काय, आपले नेहमीच्या वापरातील कपडे काढून 'कारखान्या'चे चालक पुरवतील तेच व तसेच कपडे परिधान करावे लागतात. दैनंदिन जीवनशैलीतील सगळ्या चौकटी त्यांमुळे तिथे आपसूकच मोडून पडतात.

'हॅपिनेस फॅक्टरी' ही शिक्षा नसून आंतरिक बदलासाठी स्वत:हून स्वीकारलेला तो पर्याय होय. बाह्य जगातील गोंधळ, गोंगाट, स्पर्धा, ताणतणाव, धावपळ या सगळ्याला वैतागलेले लोक त्यापासून दूर जाण्यासाठी, एकांतवासाचा अनुभव

घेण्यासाठी आणि त्यांद्वारे मानसिक शांतता व आनंद प्राप्त करून घेण्यासाठी 'हॅपिनेस फॅक्टरी'मध्ये भरती होत आहेत. अनेकांना सुरुवातीला ही गोष्ट खूपच वेगळी, अंगवळणी पडण्यास काहीशी अवघड वाटली. मात्र, या प्रयोगाचे परिणाम सकारात्मक होत असल्याचे निष्कर्ष समोर येत आहेत. हा अनुभव घेऊन बघणाऱ्यांमध्ये चांगले बदल होत असल्याचेही अभ्यासातून सिद्ध होते आहे. म्हणूनच, 'हॅपिनेस फॅक्टरी'मध्ये एकांतवासासाठी येणाऱ्यांचे प्रमाण दक्षिण कोरियात वाढते आहे. तेथील अनेक घरांतील मुले पालकांपासून आणि समाजापासून पूर्णपणे दुरावलेली आहेत. काहीही केले तरी त्या समस्येवर तिथे आजही मार्ग काढता आलेला नाही. अनेक पालकांची मुले नवतंत्रज्ञानाच्या आणि अंकीय माध्यमांच्या आहारी गेलेली आहेत. त्यांना तिथून परत कसे फिरवायचे हा मोठाच प्रश्न पालकांच्या पुढ्यात आहे. त्यांमुळे, मन:शांतीच्या शोधात असलेल्या युवकांच्या जोडीलाच आता मुलांपासून दुरावलेले असे त्रस्त पालकदेखील मोठ्या संख्येने 'हॅपिनेस फॅक्टरी'चा अनुभव घेण्यासाठी येत आहेत.

दक्षिण कोरियामध्ये २०२३ साली शासनाच्या आरोग्य व समाजकल्याण मंत्रालयातर्फे १५ हजार युवकांचे एक सर्वेक्षण करण्यात आले. हे युवक १८ ते ३४ या वयोगटातील होते. समाजात मिसळण्यापेक्षा एकांतवास अधिक आवडत असल्याचे निरीक्षण त्यातील अनेक युवकांनी नोंदवले. अशा त्या एकांतप्रिय मुलांच्या पालकांपर्यंत हे निरीक्षण पोहोचवण्यात आले तेव्हा तेही चिंतित झाले. त्यामुळे, तेथील शासनाच्या आरोग्य व समाजकल्याण मंत्रालयाने पालकांसाठी खास एका 'पालक शिक्षण अभियाना'चे आयोजन केले. Korea Youth Foundation आणि Blue Whale Recovery Center यांच्या पुढाकाराने पालकांसाठी हा कार्यक्रम घेण्यात येतो आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून या प्रयोगात सहभाग घेणाऱ्या पालकांना काही दिवस 'हॅपिनेस फॅक्टरी'मध्ये ठेवण्यात येणार आहे. काही काळ एकांतात घालवल्यानंतर आई-वडील आपल्या मुलांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतील असा विश्वास या उपक्रमात सहभाग घेणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञांना आहे. 'आनंदाच्या कारखान्या'तील काही दिवसांच्या त्या वास्तव्यादरम्यान पालक अंतर्मुख होऊन अंतर्शोधन करतील व त्यांद्वारे आपल्या पाल्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजावून घेणे त्यांना शक्य बनेल, अशी आशावादवजा भूमिका या प्रयोगाच्या मुळाशी आहे.

चौफेर कोलाहलाने व्यापले गेल्यामुळे परस्परांमधील संवाद हरपणे ही सध्याच्या आधुनिक अशा विलक्षण धकाधकीच्या युगामधील विलक्षण जटिल समस्या

दिवसेंदिवस अधिकच तीव्र होत जाण्याची लक्षणे दिसत असल्याने तिच्याबाबत काही ना काही उपाययोजना राबविणे अत्यंत आवश्यक ठरणार आहे. त्यासाठी नवे पर्याय आणि काही नूतन उपचारपद्धतीदेखील शोधाव्या लागतील, असे या क्षेत्रातील जाणकार मानसोपचार तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे ‘हॅपिनेस फॅक्टरी’सारखे आणखी काही पर्याय जगभरात विविध स्तरांवर पुढे येत जातील असा अंदाज या क्षेत्रातील संशोधक व अभ्यासक वर्तवतात. अर्थात, ही परिस्थिती केवळ दक्षिण कोरियातच उद्‌भवलेली आहे असे नाही. आधुनिक तंत्रज्ञानाच्या स्फोटाने जगभरात जे काही होते आहे त्याचेच एक रूप दक्षिण कोरियात दिसते आहे. कुटुंबातील हरवलेला संवाद पूर्ववत पुन्हा प्रस्थापित करण्यात ‘हॅपिनेस फॅक्टरी’ हा प्रभावी उतारा ठरतो का हे पाहावे लागेल.

# युरोप-१

# युरोपात उजव्या विचारसरणीची निपज केव्हा व कशी?

कडव्या, परंपराप्रिय अशा पुराणमतवादी विचारप्रणालीची रुजवण युरोपमध्ये साधारणत: १८-१९व्या शतकादरम्यान घडून आली. आपापली धनदौलत, सामाजिक प्रतिष्ठा आणि या दोहोंच्या माध्यमातून लाभलेले विशेषाधिकार जपण्याबाबत कमालीच्या जागरूक व संवेदनशील असणाऱ्या तत्कालीन समाजव्यवस्थेतील बलदंड, भांडवलदार वर्ग तिचा आरंभापासूनच पाठीराखा होता व राहिला. कोणत्याही समाजात उतरंडप्रधान व्यवस्था नांदतच असते, या धारणेवर हा वर्ग ठाम असे. अशी उतरंडप्रधान व्यवस्था ही जन्मजात असते व ती तशीच जपायची असते, अशीही त्या वर्गाची श्रद्धा होती. कोणत्याही समाजात माणसे जन्मजात कधीच एकसमान नसतात, त्यांमुळे, असमानता ही नैसर्गिक गणावी, अशी या वर्गाची सहजसिद्ध धारणा. केवळ तुल्यबळांदरम्यानच काय ती समता नांदू शकते अथवा नांदणे शक्य आहे, असे या वर्गाच्या प्रवक्त्यांचे प्रतिपादन असे. विवेकाइतकीच श्रद्धादेखील उपयुक्त व अत्यावश्यक असते, हे त्या उच्चभ्रू वर्गाचे एक पायाभूत प्रमेय असे. समता आणि बंधुता या दोन मूल्यव्यवस्थांचा अभाव असलेल्या समाजव्यवस्थेमध्ये स्वातंत्र्य नांदू शकते, या विचारप्रणालीवर त्या बलदंडांची निष्ठा असे. या वर्गाच्या लेखी सर्वोच्च महत्त्व असे ते खासगी संपत्तीला. साहजिकच, समाजव्यवस्थेमध्ये संपत्तीचे केंद्रीकरण असू नये, संपत्तीचे वाटप घडत राहावे अशा प्रकारची मानसिकता जपणाऱ्या उदारमतवादी भूमिकांशी व त्या भूमिकांची जपणूक करणाऱ्या प्रवाहांशी त्यांचा आजवर सततच झगडा उभा राहात आलेला दिसतो. काळाच्या ओघात, दोन महायुद्धांदरम्यानच्या काळात या अभिजन वर्गाची हातमिळवणी घडून आली ती फॅसिस्ट शक्तींशी.

परंतु, दुसऱ्या महायुद्धात फॅसिस्ट शक्तींचा पुरता पाडाव झाला. व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तीची प्रतिष्ठा, लोकशाही आणि स्वातंत्र्य या मूल्यांचा प्रसार-प्रचार-अंगीकार युरोपभर घडून आला. परंतु, या ठिकाणी आवर्जून नोंदविण्याजोगी बाब म्हणजे,

१९६०च्या दशकाच्या उत्तरार्धात फॅसिस्टोत्तर कालखंडात उदयाला आलेल्या पुराणमतवादी प्रवृत्तींची सांगड पुन्हा एकवार युरोपातील पारंपरिक अभिजनांशी जुळून आली. साधारणपणे तेव्हापासूनच युरोपीय समाजमानसामध्ये या उजव्या विचारप्रणालीने स्वत:साठी अवकाश निर्माण करण्याची पायाभरणी केली.

या विचारधारेला सर्वसामान्यांकडून भरघोस स्वीकृती उत्पन्न होण्यास कारणभूत ठरले ते अमेरिकी 'सब्प्राइम' कर्जांचा फुगा फुटण्याने २००८ साली वैश्विक अर्थव्यवस्थेत अवतरलेले वित्तीय अरिष्ट. त्या दणक्याने जगभरातील देशोदेशींचे अनेक लोकसमूह आर्थिक ओढगस्तीमध्ये लोटले गेले. अगणितांचे रोजगार हरपले. नोकरदार श्रमिकांच्या क्रयशक्तीची त्यापायी हानी घडून आली. अत्याधुनिक तंत्रज्ञाने आणि जागतिकीकरण या उभय शक्ती जणू काही आपल्या मुळावरच उठलेल्या आहेत, अशी त्या हतभागी जनसमूहांची तेव्हापासून धारणा पक्की बनू लागली. आश्वासनांची पूर्तता न करणाऱ्या सत्ताधीश सरकारांबाबत अशा समूहांच्या मनात अविश्वासाची भावना बळावू लागली. अनेक पश्चिमी राष्ट्रांमध्ये शासनसंस्थेने पूर्वापार पुरविलेले सुरक्षा कवचही क्रमाक्रमाने ढासळत आलेले होते. परिणामी, बहुविध अभावग्रस्ततेमध्ये लोटल्या गेलेल्या अशा वंचितांची अस्वस्थता क्रमाक्रमाने बळावत राहिली. १७ नोव्हेंबर २०११ या दिवशी अवचितच तोंड फुटलेली 'ऑक्युपाय वॉलस्ट्रीट' ही जनसामान्यांची उत्स्फूर्त चळवळ, युरोपीय समुदायामधून ब्रिटनने बाहेर पडावे (ब्रेक्झिट) हा कौल आणि पुढे २०१६ साली डोनाल्ड ट्रम्प यांची अमेरिकेच्या अध्यक्षपदी झालेली निवड ही सारी त्याच अस्वस्थतेची दृश्य परिमाणे ठरतात. या जनसमूहांच्या मनात कोंदटलेल्या अस्वस्थतेचा पुरेपूर लाभ पद्धतशीरपणे उठविण्यास उजव्या विचारधारेच्या पाठीराख्यांनी आणि प्रणेत्यांनी तेव्हापासूनच सुरुवात केली. याच मानसिकतेने अन्य देशांमधून प्रवेशणाऱ्या स्थलांतरितांना कडवा विरोध करण्यास प्रारंभ केला.

या सगळ्या स्थित्यंतरांदरम्यान उजव्या विचारप्रणालीमध्ये घडून आलेला आणखी एक सूक्ष्म परंतु मूलभूत स्वरूपाचा बदल अधोरेखित करून ठेवावयास हवा. युरोपीय समुदायातील अनेक देशांमध्ये आर्थिक बाबींसंदर्भात उजव्या विचारसरणीकडे झुकलेले पुराणमतवादी पक्ष व त्यांची सरकारे पूर्वीपासूनच सत्तेवर होती. परंतु, त्या पुराणमतवाद्यांचे त्यांच्या त्यांच्या देशातील लोकशाही समाजवादी पक्षांशी अथवा विचारधारांशी निदान संवाद तरी असे. फ्रान्स, इटली, जर्मनी यांसारख्या देशांतील पुराणमतवादी व आर्थिक बाबींसंदर्भातील उजवी सरकारे कामगार चळवळींशी

सौहार्दपूर्ण संबंध जपणारी होती. आपल्या विचारसरणीपेक्षा निराळी विचारप्रणाली असणारे घटक व समूह यांच्याशी संवाद अबाधित राखत परस्परांच्या हितसंबंधांचा मेळ घालण्याची कार्यपद्धती ती सरकारे व्यवहारात अंगीकारत असत. परंतु, १९८० सालानंतर मात्र हे सगळेच चित्र पुरते पालटले. ब्रिटनमध्ये मार्गारेट थॅचर आणि अमेरिकेमध्ये रोनाल्ड रेगन यांनी अवलंबलेल्या अतिउत्साही उदारमतवादी धोरणप्रणालीची परिणती, मुख्यत:, डाव्या विचारसरणीबरोबर तिथवर नांदत आलेले किमान कार्यकारी स्वरूपाचे संबंधदेखील व्यावहारिक पर्यावरणामधून पार हद्दपारच होण्यात घडून आली.

**परिणती, अत्युत्साही आर्थिक उदारमतवादाची**

अति उजव्या शक्तींना हातपाय पसरण्यास वाव उत्पन्न झाला तो नेमका तिथे व तेव्हापासूनच. ती सगळी प्रक्रियाच नीट समजावून घ्यावयास हवी. थॅचर-रेगन या जोडगोळीने आपापल्या देशात अर्थकारणाबाबत अंगीकारलेल्या अत्युत्साही उदारमतवादी भूमिकेने अर्थकारणातील शासनसंस्थेच्या भूमिकेकडे बघण्याचा प्रस्थापित दृष्टिकोनच मुळातून पार बदलून टाकला. सार्वजनिक कल्याणाचा भार वाहण्याबाबत शासनसंस्था ही काही सर्वोत्तम व्यवस्थापक ठरू शकत नाही अथवा ठरणार नाही, ही मानसिकता त्या धोरणप्रणालीद्वारे समाजमानसामध्ये व्यापक स्तरावर स्थिरावू लागली. वाहतूक, आरोग्य व शिक्षणासारख्या सामाजिक सेवांच्या क्षेत्रामध्ये शासनसंस्थेपेक्षाही खासगी क्षेत्रच अधिक परिणामकारक ठरू शकते, ही धोरणदिशा अर्थचिंतनविश्वात मूळ धरू लागली. अर्थव्यवहारात व समाजजीवनात व्यक्तिवाद बळावू लागला. सार्वत्रिक बांधिलकीची भावना क्रमाने निस्तेज बनू लागली. व्यवहारात संधींची असमानता चौफेर मुबलक नांदत असतानाच प्रत्येक व्यक्तीने मात्र स्वयंपूर्ण बनावे, या भूमिकेला पाठबळ लाभू लागले. 'बलवान तोच तगेल' (सर्व्हायव्हल ऑफ द फिटेस्ट) या डार्विनच्या सिद्धान्ताचा पाठपुरावा सामाजिक क्षेत्रात केला जाऊ लागला. जागतिकीकरण, महागाई, श्रमिकांना मिळणारा अपुरा व निम्न मेहेनताना, सर्वस्तरीय असुरक्षितता, सहनशीलता, बहुसांस्कृतिकता यांसारख्या बाबींविरुद्ध सातत्याने आघाड्या उघडल्या जाऊ लागल्या. अति उदारमतवादाद्वारे जागतिकीकरणाला मिळणारा बढावा, परिणामी खुल्या होणाऱ्या व्यापारी सीमा, वैश्विक स्तरावरील हेलकाव्यांमुळे देशी अर्थव्यवस्थेत उमटणारे हेलकावे, त्यांपायी आर्थिकदृष्ट्या निम्नस्तरीयांची होणारी ससेहोलपट, स्थलांतरित कर्मचाऱ्यांच्या अथवा नागरिकांच्या माध्यमातून रूजणाऱ्या बहुसांस्कृतिकतेद्वारे हळूहळू लोप पावू पाहणारी देशी परंपरा

व संस्कृती... अशांसारख्या नवप्रवाहांबाबत सर्वसामान्य नागरिकांच्या मनात असंतोष दाटू व वाढू लागला. नेमक्या याच मानसिक अस्वस्थतेची परिणती 'उजव्या' विचारसरणीचे अवस्थांतर 'अति उजव्या' विचारधारेमध्ये होण्यात उघडून आली.

एकंदर समाजजीवनात तिथपासूनच एक नवीन मानसिकता रुजू लागली अथवा रु जवण्याचे जोरकस प्रयत्न युरोपातील विविध देशांमध्ये चालू झाले. पूर्वगौरवादाला बहर चढू लागला. गतकालीन घटितांची तोडमोड करून इतिहासाचे विपर्यस्त, अ-यथार्थ असे सादरीकरण व कथन चहूंकडे चालू झाले. सर्वसामान्यांच्या मनावर अनाम आक्रमणांच्या भयाचे पटल सतत विणलेले राहील, याची दक्षता घेतली जाऊ लागली. राजकीय व्यवस्थेचा ढाचा व पोतही बदलू लागला. राजकीय पक्षांमधील अंतर्गत लोकशाहीला वेगाने कसर लागू लागली. एखाद्या सर्वशक्तिमान नेत्याच्या सभोवती वलयनिर्मितीला प्राधान्य मिळू लागले. समाजमन सतत अस्वस्थ, भयशंकित व संशयग्रस्त राहील अशा पद्धतीने सार्वजनिक चर्चाविश्व विणले जाऊ लागले. विवेकाला बळ पुरविले जाण्याऐवजी भावना चेतविणाऱ्या विषयांना फुंकर घातली जाऊ लागली. यांतूनच एक प्रकारचा उग्र राष्ट्रवाद आणि अति उजवा एकवांशिकतेचा आग्रह धरला जाऊ लागला.

युरोपच्या तिथवरच्या मानसिकतेला हे सगळेच प्रवाह पार अपरिचित होते. जगातील एकंदर लोकसंख्येपैकी जवळपास सात टक्के लोकसंख्या युरोपात नांदते आहे. जगभरातील संपत्तीच्या एकंदर निर्मितीमध्ये युरोपचा वाटा आहे जवळपास २५ टक्क्यांचा. तर, सामाजिक बाबींवर जगभरात केल्या जाणाऱ्या एकंदर खर्चापैकी जवळपास निम्मा खर्च एकट्या युरोपात होतो. ही सारी परिणती युरोपातील नवसर्जन व उद्यमशीलतेची गणली जाते. कोणत्याही समाजातील नवशोधन, नवसर्जन, उद्यमशीलता यांचा उगम बहुविधता आणि निरनिराळे सांस्कृतिक संचित लाभलेल्या जनसमूहांच्या सरमिसळीद्वारे घडून येत असतो, असा आजवरचा दाखला राहिलेला आहे. ब्रिटन, जर्मनी व फ्रान्स या युरोपीय समुदायातील तीन सर्वांत बलिष्ठ अर्थव्यवस्थांचा ऊर्जास्रोत नेमका तोच राहिलेला आहे. बाहेरून आलेल्या स्थलांतरितांच्या जीवावरच कल्याणकारी कारभाराचे कंकण बांधलेल्या शासनसंस्था वाढू शकतात, हा अनुभव आजचा नाही. आणि युरोपात नव्याने बलिष्ठ होत असलेल्या अति उजव्या विचारसरणीचा नेमका याच स्थलांतरितांना विरोध आहे.

व्यक्तीची प्रतिष्ठा, समता आणि स्वातंत्र्य ही युरोपीय समुदायाच्या पायाभूत मूल्यव्यवस्थेतील सर्वोच्च मूल्ये गणली जातात. यांबाबत तडजोड युरोपीय मानसिकतेने

आजवर कधीच स्वीकारलेली नाही, असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे प्रतिपादन आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य यांचा प्रवास हातात हात गुंफूनच होत असतो. नागरिकांची प्रतिष्ठा जपण्यात अपयशी ठरणाऱ्या अथवा नागरिकांच्या प्रतिष्ठेला दुय्यम लेखणाऱ्या शासनसंस्थेची उपयुक्तता आणि कायदेशीर अधिमान्यताच एकप्रकारे संपुष्टात येत राहते. मग राजकारणाला तिथे वावच राहत नाही. त्यांतूनच एकाधिकारशाही प्रवृत्तींना अधिक वाव मिळत राहतो.

अतिरिक्त उदारमतवादी आर्थिक धोरणांच्या आग्रही आणि अत्युत्साही अंमलबजावणीदरम्यान समाजातील विविध घटकांना किमान कल्याणाची हमी व्यवहारात देण्याबाबत शासनसंस्थेला येत राहिलेल्या अपयशापायी अर्थकारणातील विषमता फैलावत आलेली दिसते. खुल्या बाजारपेठीय अर्थकारणाद्वारे साकारणाऱ्या लाभांचे वाटप अर्थव्यवस्थेत समन्यायी पद्धतीने घडवून आणण्याबाबत शासनसंस्थेने कटिबद्धता दर्शवणे हाच अति उजव्या विचारधारेच्या मुकाबल्याचा ठोस पर्याय ठरू शकतो, असे विश्लेषकांचे सांगणे आहे. आर्थिक लाभांचे वितरण व झिरपण अर्थव्यवस्थेच्या विविध स्तरांमध्ये घडून येण्यासाठी अनुरूप अशी 'चॅनेल्स' सक्षम बनविणे, हे शासनसंस्थेचे त्या संदर्भातील आद्य कर्तव्य ठरते. जागतिकीकरणाद्वारे देशोदेशींच्या रोजगारांचे होत असलेले स्थलांतरण रोखणे, देशी अर्थव्यवस्थांमध्ये चांगल्या दर्जाच्या उत्पादक स्वरूपाच्या रोजगारांची निर्मिती पुरेशा प्रमाणावर करणे, हा त्या दिशेने करावयाच्या प्रयत्नांचा एक मुख्य भाग ठरेल, असे युरोपीय देशांमधील अर्थवेत्यांचे विश्लेषण आहे. रोजगारनिर्मितीला चालना मिळाल्याचे सुपरिणाम दुहेरी दिसतील. रिकाम्या हातांना कामे मिळाल्याने श्रमिकांच्या आत्मप्रतिष्ठेची पुनर्स्थापना होईल. तर, दुसरे म्हणजे रोजगारनिर्मितीद्वारे अर्थव्यवस्थेतील मूल्यनिर्मितीला वेग येईल. परिणामी, देशी ठोकळ उत्पादनाच्या वाढीचा वेग वाढून त्यांद्वारे शासनसंस्थेकडे वाहणारा करमहसूलाचा स्त्रोत सशक्त बनेल. कल्याणकारी योजनांच्या प्रवर्तनासाठी पुरेसा निधी त्यांद्वारे उपलब्ध होण्याने सर्वसमावेशक अशा उपक्रमांचे प्रवर्तन घडवून आणणे शासनसंस्थेस शक्य बनेल. त्यांतून अर्थव्यवस्थेतील विषमतेची दरी निरुंद बनवणे शक्यतेच्या आवाक्यात येईल, असा अर्थतज्ज्ञांचा सांगावा आहे. अर्थकारणाचा पोत अशा पद्धतीने पालटण्याने समानतावादी प्रवाहांचे हात बळकट बनून अति उजव्या विचारधारेच्या प्रवाहास क्रमाक्रमाने ओहोटी लागण्याच्या दिशा प्रशस्त बनाव्यात, अशी आशा युरोपातील विश्लेषक व्यक्त करताना दिसतात.

# युरोप-२

# युरोपीय उजव्या विचारसरणीचे संमिश्र अंतरंग

कडवी उजवी विचारसरणी आणि/अथवा अति उजवी विचारसरणी या वर्गांमध्ये जमा होणाऱ्या प्रवृत्तींचा अथवा मानसिकतेचा गेल्या जवळपास तीन दशकांदरम्यान युरोपात घडून येत असलेला विस्तार आणि स्वीकार अनेक अभ्यासकांना बुचकळ्यात टाकणारा आहे. युरोपीय समुदायातील सर्वच देशांमध्ये हा विस्तार एकसारख्याच सघनतेने व सखोलपणे घडून येताना दिसत नाही, ही बाब खरी असली तरी या प्रक्रियेपायी युरोपातील देशोदेशींचे समाजमानस सध्या ढवळून निघते आहे हेदेखील तितकेच खरे. नाझी प्रवृत्तींचा बीमोड दुसऱ्या महायुद्धादरम्यान झाल्यानंतर जेमतेम तीन ते साडेतीन दशकांनंतरच पुन्हा तशाच वृत्ती-प्रवृत्तींना मूळ धरण्यास युरोपीय मनोभूमीमध्ये कमी-अधिक प्रमाणात अनुकूल अवकाश लाभावा याचा सामाजिक घटना-घडामोडींच्या संवेदनशील व विचक्षण अभ्यासकांना मोठाच विस्मय वाटताना दिसतो. या बदलत्या प्रवाहामागे कोणता कार्यकारणभाव सक्रिय असावा, यांबद्दलही अभ्यासकांमध्ये विचारमंथन सतत चालू आहे. युरोपीय समुदायाच्या संसदेसाठी अगदी अलीकडेच पार पडलेल्या निवडणुकांमध्ये समुदायातील निरनिराळ्या देशांमध्ये उजव्या आणि/अथवा अति उजव्या विचारप्रणालीची पाठराखण करणाऱ्या राजकीय पक्षांना जो लक्षणीय जनाधार प्रकट झाला त्यांमुळे तर युरोपातील अभ्यासक, संशोधक व एकंदरच सुजाण-संवेदनशील नागरिक अधिकच प्रकर्षाने या बदलत्या मानसिकतेबाबत सचिंत चिंतन-मंथन करताना दिसतात.

सुमारे दशकभरापूर्वी मुख्यत: सीरियामधून जे लक्षावधी स्थलांतरित युरोपीय समुदायातील अनेक देशांमध्ये अधिकृतरीत्या/अनधिकृतरीत्या प्रवेशले तेव्हापासूनच युरोपीय समाजमानस व्यापक प्रमाणावर अस्वस्थ बनलेले होते. अर्थात, त्या अर्थाने २०१५ सालदेखील असाधारणच शाबीत झाले. कारण, आश्रय मिळावा म्हणून युरोपीय समुदायातील विविध देशांकडे त्या एकाच वर्षात तब्बल १३ लाख परदेशी

स्थलांतरित नागरिकांनी अर्ज केले. आश्रयाची याचना करणारे अर्ज परदेशी स्थलांतरितांकडून एवढ्या प्रचंड संख्येने, तेही एकाच वर्षात, केले जाण्याची ती दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतरची पहिलीच घटना होती. २०१५ साली मोठ्या प्रमाणावर युरोपीय देशांकडे घडून आलेल्या त्या स्थलांतरितांमध्ये संख्यात्मकदृष्ट्या सीरियातील नागरिकांची संख्या मोठी असली तरी केवळ सीरियामधूनच युरोपीय समुदायाकडे स्थलांतरितांचा ओघ वाहत होता, असेही समजणे चुकीचे ठरेल. युरोपकडे धाव घेणाऱ्या स्थलांतरितांमध्ये सीरियाच्याबरोबरीनेच अफगाणिस्तान, नायजेरिया, पाकिस्तान, इराक, एरिट्रिया, लीबिया, सुदान, सोमालिया, येमेन, कोसोवो यांसारख्या मध्य पूर्व व उत्तर आफ्रिकेतील काही देशांच्या नागरिकांचाही समावेश होता. आपापल्या देशांमधून बाहेर पाय काढणाऱ्यांच्या जत्थ्यांकडे बारकाईने बघितले तर एक गोष्ट आपल्या सहज ध्यानात येते आणि ती अशी की ज्या ज्या देशांमधील समाजवास्तव सततचे वांशिक संघर्ष, हिंसाचार, युद्धांपायी अथवा युद्धजन्य परिस्थितीपायी उद्भवणारी अशांतता व असुरक्षितता, दंगली, रक्तपात, आर्थिक अस्थैर्य अथवा दुरवस्था यांपायी प्रदीर्घ काळ गांजलेले राहिले अशा देशांमधील नागरिक जीवित सुरक्षा, किमान सामाजिक शांती, मुलाबाळांचे सुरक्षित व आशादायी भविष्य, कमालीची गरिबी, आर्थिक प्रगती व स्थैर्याच्या संधींचा शोध अशा विविध कारणांपायी/उद्दिष्टांपायी मायदेशातून बाहेर पडत राहिले. लेबनॉन, इजिप्त, जॉर्डन यांसारख्या देशांची त्यांना आसरा देण्याबाबतची क्षमता अपुरी पडायला लागल्यानंतर


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

त्यांनी युरोपीय देशांची वाट पकडली. मिळेल त्या मार्गांनी अगणित नागरिकांनी युरोपीय समुदायातील अनेक देशांच्या सीमा गाठल्या.

युरोपीय देशांकडे झालेला स्थलांतरितांचा तो साराच प्रवास विलक्षण जोखमीचा आणि धोके व खाचखळग्यांनी भरलेला होता. स्थलांतरितांपैकी बहुसंख्यांनी पर्याय निवडला तो सामुद्रिक मार्गाने युरोपीय देशांच्या किनाऱ्यांवर धडकण्याचा. काही हजार स्थलांतरित खुष्कीच्या मार्गाने युरोपीय समुदायातील देशांच्या सीमांवर येऊन पोहोचले. लोंढ्यालोंढ्यांनी आपल्या देशांच्या सीमांवर येऊन ठाकलेल्या या स्थलांतरितांबाबत युरोपीय देशांची भूमिका स्वागतार्ह नसावी, हे ओघानेच आले व ते समजण्यासारखेही होते. एक तर, इतक्या मोठ्या संख्येने आलेल्या परदेशी स्थलांतरितांना सामावून घ्यावयाचे तर देशांतर्गत पायाभूत सेवासुविधांसह एकंदरच अर्थकारणावर भार पडणार हे उघडच होते. युरोपीय समुदायातील देशांमध्ये तुलनेने सर्वांत बलाढ्य व आर्थिकदृष्ट्या बळकट देश होता जर्मनी. स्थलांतरितांपैकी सर्वाधिकांना सामावून घेतले ते जर्मनीने. आश्रयाच्या याचनेने विस्थापित स्थलांतरितांचे लोंढे जर्मनीव्यतिरिक्त हंगेरी, स्वीडन, इटली, फ्रान्स, ग्रीस, ऑस्ट्रिया या देशांचे दरवाजे ठोठावत राहिले. स्थानिकांच्या तुलनेत स्थलांतरितांची संख्या अथवा/आणि प्रमाणच फुगत राहिले तर देशांतर्गत उपलब्ध साधनसामग्रीच्या वाटपाची समस्या उद्भवून ती उग्र बनेल, ही चिंता अनेक तुलनेने लहान युरोपीय देशांना भेडसावू लागली. युरोपातील लहान अर्थव्यवस्थांचा मुख्य विरोध राहिला तो त्याच कारणापायी. परंतु, याच्या जोडीनेच किंबहुना काकणभर अधिकच बव्हंश युरोपीय समाजाचा स्थलांतरितांना आसरा देण्याबाबत कठोर विरोध होत राहिला तो एका वेगळ्याच कारणापायी.

**'रिप्लेसमेन्ट थिअरी' किती वास्तव, किती काल्पनिक?**

ते कारण मुख्यत: होते सांस्कृतिक व सामाजिक. अन्य सामाजिक व सांस्कृतिक परंपरा व पार्श्वभूमी असणारे परदेशस्थ मोठ्या संख्येने आपल्या देशात वस्तीस आले तर आपली सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक व धार्मिक वीण विसविशीत होईल, अशी आशंका युरोपीय मानसामध्ये बळकटपणे वसत होती व आजही वसते आहे. अन्य देशांमधून येणारे स्थलांतरित आपल्या देशातच स्थायिक होण्याने पारंपरिक युरोपीय मूल्यांना कसर लागेल, अशीही भीती युरोपीय समुदायातील देशवासियांना वाटत होती. आजही तीच भीती त्यांच्या मनामध्ये नांदते आहे. या सगळ्यापेक्षाही युरोपीय गौरवर्णी जनसमूहांना धसका होता व काही अंशी आजही आहे तो 'रिप्लेसमेन्ट

थिअरी'चा. हे सिद्धान्तन प्रदीर्घ काळ युरोपीय मानसिकतेमध्ये दृढपद झालेले आहे. अन्य देशांमधील भिन्नवंशीय समाज, आणि मुख्यत: इस्लामधर्मीय तसेच इस्लामबहुल देशांमधील शक्ती, गौरवर्णी युरोपीय देशांमधील गौरवर्णी नागरिक, त्यांच्याच देशात, यथावकाश, अल्पसंख्याक बनावेत यासाठी अनेकविध मनसुबे रचून ते व्यवहारात उतरविण्यासाठी नाना प्रकारची कटकारस्थाने रचत आहेत, असे भयसावट युरोपीय समुदायातील नागरिकांचे मन:पटल सतत व्यापून राहिलेले आहे. ही धारणा तशी जुनीच आहे. तिचा उगम आजचा नाही. एका प्रकारे, युरोपीय गौरवर्णीयांना त्यांच्या मायदेशातील त्यांच्या प्रभुत्वशाली स्थानावरून भ्रष्ट करून ते स्थान आपण बळकविण्याचा, मुख्यत: इस्लामधर्मीयांचा मनसुबा आहे, या विचारधारेला 'रिप्लसेमेन्ट थिअरी' असे संबोधले जाते.

हे सिद्धान्तन कितपत वास्तव आहे, इस्लामधर्मीयांच्या अशा प्रकारच्या विचारपद्धतीबाबत खरोखरच काही ठोस पुरावे आजवर कोठे गवसले आहेत किंवा नाही, गौरवर्णीय समाजाच्या मनात खोलवर घर करून बसलेली ही आशंका किती कल्पित आणि किती वास्तव आहे यांबद्दल कोठेही ठोस काहीही पुरावे नाहीत. मात्र, मुख्यत: फ्रान्सवंशीय आणि एकंदर युरोपीय समूहांची जागा हे अन्यवंशीय, परदेशस्थ बळकवणार, अशी शक्यतावजा भीती मात्र सतत प्रगट केली जाते. स्थलांतराद्वारे युरोपच्या भूमीवर प्रवेश करावयाचा व त्यानंतर आपली लोकसंख्यात्मक वाढ साध्य करत गौरवर्णी समाजांना त्यांच्याच भूमीवर अल्पसंख्याक बनवायचे, असा स्थलांतरितांचा छुपा कावा असतो व आहे, हा अनेक युरोपीयांचा पक्का समज आजही आहे. त्यांतच, भरीस भर म्हणून की काय पण, सर्वांगीण विकासाची घसघशीत उच्च श्रेणी साध्य केलेल्या देशोदेशीच्या युरोपीय समुदायांचा अलीकडील अनेक वर्षे घसरलेला सरासरी जननदर व परिणामी एकंदर लोकसंख्येमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे असणारे संख्यात्मक प्राबल्या यांपायी 'रिप्लेसमेन्ट थिअरी'च्या सार्थतेबाबत व्यावहारिक शंकाही उपस्थित करणे अवघड बनून जाते. अनेक अभ्यासकांनी तसेच संशोधकांनी या सिद्धान्तनाच्या अ-यथार्थबाबत निर्वाळे देऊनदेखील सर्वसाधारण युरोपीय मन या संभाव्य घटितासंदर्भात कमालीचे धास्तावलेलेच असते.

...आणि सर्वसामान्य युरोपीय नागरिकाच्या मनात ठाण मांडून बसलेल्या नेमक्या याच भयशंकेचा लाभ निखळ राजकीय स्वार्थासाठी पुरेपूर उठवला तो उजव्या आणि/अथवा अति उजव्या विचारसरणीच्या प्रवृत्तींनी. त्याच भयशंकेचे भांडवल करत उजवी व अति उजवी विचारप्रणाली जोपासणाऱ्या राजकीय पक्षांनी जनमानसातील

तसेच आपापल्या देशातील राजकीय व्यवस्थेमधील आपले आसन बळकट करण्याचा उपक्रम वर्षानुवर्षे मन:पूर्वक जोपासला आणि अवलंबलादेखील. युरोपीय संसदेच्या निवडणुकीदरम्यान युरोपीय समुदायातील अनेक देशांमध्ये उजव्या तसेच/किंवा कडव्या उजव्या विचारधारेला मतपेटीच्या माध्यमातून तो वाढता प्रतिसाद निष्पन्न झाला, त्याचा एक धागा युरोपबाहेरील अन्य देशांमध्ये कारणपरत्वे नांदणाऱ्या सामाजिक-आर्थिक-राजकीय-वांशिक अस्वस्थतेशी जैविक रीतीने जुळलेला आहे तो असा.

स्थलांतरितांचा तो प्रश्न २०१५-१६ या वर्षांदरम्यान अवचितच उद्भवल्यामुळे देशोदेशींच्या राजकीय व्यवस्थेमध्ये तांब्याभांडे चांगल्यापैकी स्थिर केलेल्या अति उजव्या विचारसरणीची रंगरूपे देशागणिक निरनिराळी दिसत असली तरी निदानपक्षी पाचएक पैलू तरी सर्वत्र समान दिसतात. राष्ट्रवादाचा पुकारा, वंशविद्वेष, परदेशस्थांविषयीची भीती अथवा तिरस्कार, बळकट शासनसंस्थेचा पुरस्कार आणि एकंदर लोकशाहीविरोधी दृष्टिकोण अथवा पवित्रा, हे ते पाच पैलू होत. युरोपीय समुदायात अलीकडील काळात उग्रपणे व्यक्त होत आलेल्या अति उजव्या विचारप्रणालींमध्ये या पाचही पैलूंचा आढळ सर्वत्र एकसारख्याच तीव्रतेने अथवा सघनतेने होते, अशातील भाग मुळीच नाही. त्यांपैकी काही पैलू काही देशांमध्ये तर काही पैलू अन्य देशांमध्ये आजवर कारणपरत्वे अथवा प्रसंगनिहाय दृग्गोचर होत आलेले आहेत. परंतु, यापैकी कोणत्याही एक-दोन अथवा अधिक पैलूंना ज्या वेळी त्या त्या देशातील लोकशाही संस्थांची पायमल्ली अथवा उपेक्षा अथवा अधिक्षेप आणि समतेच्या तत्वाला हरताळ फासला जाण्यासारख्या बाबींची जोड मिळते तेव्हा मात्र अति उजव्या विचारप्रणालींचा त्या त्या देशातील प्रगटाविष्कार अधिक आक्रमक असल्याचे आजवर प्रकर्षाने व पदोपदी दिसत आलेले आहे.

**बहुविध अंतरंग आणि संमिश्र छटा**

इथेही, याच संदर्भातील आणखी एका वैविध्याची नोंद करून ठेवावयास हवी. युरोपातील उजव्या विचारप्रणालीमध्येदेखील 'उजवी', 'अति उजवी' आणि 'कडवी उजवी' अशा तीन छटा आताशा आढळून येतात. त्या अर्थाने युरोपीय उजव्या विचारप्रणालीचे अंतरंग एकात्म नक्कीच नाही. त्यांत संमिश्र छटा आहेत. सर्वसाधारणपणे आर्थिक धोरणदृष्टीच्या संदर्भात उजवी परंतु डाव्या समाजवादी विचारसरणींशी कामापुरता संवाद कायम राखणारी उजवी विचारसरणी युरोपातील अनेक देशांमध्ये अलीकडील काळात सत्तापट सांभाळत आलेली आहे. उजवेपणाची ही मूळ छटा त्यांमुळे तशी पूर्वापारची. स्थलांतरितांच्या समस्येचा अलीकडे अकस्मातच उद्भव

झाल्यानंतर त्याच उजव्या विचारप्रणालींपैकी काहींनी अति उजवा पेहराव धारण केला. त्यांतही पुन्हा एकरसतेचा अभावच आहे. अति उजव्या विचारप्रणालीचे व्यवच्छेदक लक्षण सूचित करणारे पाच पैलू आपण बघितले. तर, आताशा त्याच्याच जोडीने उजव्या विचारप्रणालीचाच आता एक ‘कडवा’ अवतार युरोपातील काही देशांमध्ये साकार होताना दिसतो. शासनसंस्थेच्या अमलासंदर्भात हुकुमशाही खाक्या, देशीवादाचा पुरस्कार आणि एकंदरीने बहुजनवादी (पॉप्युलिस्ट्स्) धोरणांकडे झुकलेला कल ही तीन त्या कडव्या उजव्या विचारसरणीची युरोपातील द्योतके ठरत आहेत.

उजव्या विचारसरणीची ही निरनिराळी आणि बहुविध सघन व सखोल अशी जी रूपे युरोपीय समुदायातील वेगवेगळ्या देशांत दिसू लागलेली आहेत त्यांपायी जिज्ञासा जागृत झालेले अनेक अभ्यासक आता त्यांचे रंगरूप अधिक नेमकेपणे जाणून घेण्यासाठी अधिक संशोधनाकडे वळत आहेत. उजव्या तसेच अति उजव्या विचारसरणीच्या व्यवहारासंदर्भात युरोपातील अभ्यासकांनी आजवर जे संशोधन केलेले आहे त्यांच्या निष्कर्षानुसार, अति उजवी विचारसरणीदेखील ‘पारंपरिक अति उजवी’ आणि ‘नूतन अति उजवी’ अशा दोन गटांत आता विभागता येणे शक्य आहे अथवा विभागता येईल. केवळ इतकेच नाही तर, या दोन उप-प्रणाली एकमेकींबरोबर सुखेनैव नांदत असल्याचे चित्रदेखील काही ठिकाणी दिसते. राष्ट्रीय समाजवादाच्या विचारप्रणालीबरोबर संवादी असलेली अति उजवी पारंपरिक विचारप्रणाली वांशिक राष्ट्रवादाचा उद्घोष करणाऱ्या नूतन अति उजव्या विचारप्रणालीबरोबर एकाच भूमीवर आज व्यवहारताना दिसतात, असे संशोधकांचे निरीक्षण आहे. त्याचवेळी, ‘अति उजवी विचारप्रणाली’ आणि ‘कडवी उजवी विचारप्रणाली’ यांच्यातील तफावतीमुळे या दोन विचारसरणी जशा परस्परांपेक्षा स्वच्छपणे निराळ्या दाखवता येतात त्याचप्रमाणे, याच दोन विचारप्रणालींच्या संधिछायेत अथवा छेदसंचात नांदणारी, ‘वांशिक राष्ट्रवादा’चा उद्घोष करणारी विचारसरणीदेखील काही युरोपीय देशांमधील राजकीय व्यवहारात सक्रिय असल्याचेही संशोधकांचे प्रतिपादन आहे.

**धारणा पक्की परंतु संकल्पना संदिग्ध**

युरोपातील अति उजव्या विचारसरणीची वैचारिक मूस ‘राष्ट्रवाद’ या संकल्पनेच्या आसाभोवती विकसित झालेली दिसते. वांशिक एकात्मतेचा आग्रह धरणाऱ्या एकात्म राष्ट्राचा ही विचारप्रणाली हिरिरीने पुरस्कार करते. एकात्म राष्ट्राच्या कल्पनाचित्राची पाठराखण करणाऱ्या राष्ट्रवादाशी बांधिलकी राखण्याबाबतची या विचारधारेची धारणा

कणखर व पक्की असली तरी ती संकल्पित एकात्मता नेमक्या कोणत्याबाबतीत जपायची या संदर्भात मात्र स्पष्टतेचा अभावच दिसतो. या संकल्पित एकात्मतेचा आशय धार्मिक असावा, वांशिक ठेवावा की सांस्कृतिक एकात्मतेचा वसा राखावा–जपावा यांबाबत या विचारसरणीचा कंठरव करणाऱ्यांच्यामध्ये युरोपीय समूहात सघन संदिग्धता नांदत असल्याचे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. या संदर्भातील ती संदिग्धता व्यवहारात लक्षणीय शाबीत होते कारण स्थलांतरितांसंदर्भात नेमकी कोणती भूमिका अंगीकारावयाची यांबाबत मग व्यावहारिक अडचणी उभ्या ठाकतात. युरोपात अलीकडील काळात अति उजव्या विचारप्रणालीला मिळत असलेल्या वाढत्या बळाच्या मुळाशी असणारी मूळ व जटिल समस्या स्थलांतरितांशी निगडित असल्यामुळे या संदिग्धतेची तड लागणे निकडीचे ठरते, अशी अभ्यासकांची भूमिका आहे.

एकात्म राष्ट्रवादाचा उद्घोष करणाऱ्यांपैकी ज्यांना सांस्कृतिक राष्ट्रवाद प्रिय अथवा/आणि अपेक्षित आहे त्यांची स्थलांतरितांसंदर्भातील भूमिका वांशिक राष्ट्रवादाची पाठराखण करणाऱ्यांच्या स्थलांतरितांसंदर्भातील भूमिकेपेक्षा गुणात्मकरीत्या अतिशय भिन्न आहे. ती तुलनेने अधिक सामंजस्यपूर्ण, उदार व समावेशक असल्याचे अभ्यासकांचे प्रतिपादन सांगते. अन्य देशांमधून आपल्या देशात कारणपरत्वे प्रवेश करणाऱ्यांना आंधळा व आक्रस्ताळा असा अकारण विरोध सांस्कृतिक राष्ट्रवाद जपणाऱ्या अति उजव्यांचा व्यवहारात वा सैद्धान्तिक पातळीवरही दिसत नाही. स्थलांतरण करून देशी लोकव्यवहारात समाविष्ट झालेले स्थलांतरित देशी संस्कृतीशी यथावकाश एकरूप, एकरस, समरस होत असतील तर तशा स्थलांतरितांना सामावून घेण्यास सांस्कृतिक राष्ट्रवादाची संकल्पना अंगीकारलेल्यांचा विरोध अथवा हरकत युरोपात दिसत नाही. सांस्कृतिक राष्ट्रवाद्यांच्या लेखी तसे स्थलांतरित सुसह्य ठरतात.

परंतु, सांस्कृतिक राष्ट्रवाद्यांची स्थलांतरितांबाबतची ही भूमिका युरोपीय अति उजव्यांमधील वांशिक राष्ट्रवाद्यांना मात्र अजिबातच मंजूर नाही. वांशिक राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या अति उजव्यांचे मात्र दुसऱ्यांबरोबर, म्हणजेच पर्यायाने स्थलांतरितांबरोबर तिथे अजिबातच सूत जुळत नाही. या बाबतीत, अति उजव्या विचारसरणीच्या युरोपीय तंबूमधील सांस्कृतिक राष्ट्रवादी आणि वांशिक राष्ट्रवादी पूर्णपणे परस्परविरोधी ध्रुवांवर उभे ठाकलेले दिसतात. स्थलांतरण हा स्थलांतरितांचा, आणि विशेषत: इस्लामधर्मीय स्थलांतरितांचा, गौरवर्णीय पाश्चिमात्य जनसमूहांच्या विरोधातील पक्का बनाव होय, अशी अति उजव्यांच्या युरोपीय गटातील वांशिक राष्ट्रवादी विचारसरणीच्या उपगटाची ठाम धारणा होय. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर स्थलांतरितांच्या प्रश्नाकडे

युरोपातील वांशिक राष्ट्रवादी 'रिप्लेसमेन्ट थिअरी'च्या भोज्यावरून बघतात. साहजिकच, गौरवर्णीयांना कमकुवत बनवणे हा 'बाहेर'च्या स्थलांतरितांचा (आणि त्यांतल्यात्यांतही पुन्हा इस्लामधर्मीयांचा) डाव असल्याने स्थलांतरितांना थारा देण्यास वांशिक राष्ट्रवाद्यांचा कडाडून विरोध सतत राहत आलेला दिसतो.

हे झाले स्थलांतरितांबाबत. हिंसेच्या पुरस्काराबाबतही सांस्कृतिक राष्ट्रवादी आणि वांशिक राष्ट्रवादी यांच्यादरम्यान एकंदरीने मतैक्याचा अभावच आहे. आघाडी स्थलांतरितांच्या विरोधात असो अथवा अन्य कोणाच्या, सरसकट हिंसाचाराला सांस्कृतिक राष्ट्रवाद्यांचा सैद्धान्तिक विरोध आहे व असतो. मात्र, आत्मसंरक्षणासाठी प्रसंगपरत्वे हिंसा करण्यास प्रत्यवाय नसावा, यांबाबत दोघांचेही एकमत दिसते. परंतु, हेदेखील दिसते तितके सोपे व सरळ नाही. आत्मसंरक्षणासाठी केलेली हिंसा आणि अन्य प्रेरणेने केली जाणारी हिंसा या दोहोंतील सीमारेषा अतिशय अस्पष्ट असल्याने तिथे व्यावहारिक समस्या उभ्या ठाकतात. शासनसंस्थेचे स्वरूप व भूमिका नेमकी काय व कशी असावी यांबाबतही युरोपीय अति उजव्यांच्या मेळ्यात सैद्धान्तिक पातळीवर धूसरताच अनुभवास येते. एकतंत्री अंमल गाजवणारी शासनसंस्था जणू नैसर्गिक रचना अथवा व्यवस्था म्हणूनच स्वीकारार्ह ठरते अथवा ठरवली जावी, असा सर्वसाधारण सूर उमटत असला तरी त्या संदर्भातील मतैक्य सरासरीने भुसभुशीत दिसते. एकंदरीने, युरोपातील अति उजवी विचारप्रणाली नाना प्रकारच्या, बहुआयामी घुसळण पर्वामधून प्रवास करताना दिसते आहे.

# युरोप-३

# अति उजव्या विचारांना युरोपमध्ये बळ कशामुळे...?

टोकाच्या उजव्या अथवा अति उजव्या विचारसरणीची तळी उचलून धरणाऱ्या राजकीय पक्षांना युरोपातील देशोदेशी नव्याने मिळत असलेला उत्स्फूर्त व वाढता पाठिंबा केवळ राजकीय विश्लेषकांनाच नव्हे तर कोणाही किमान विचारी व्यक्तीला बुचकळ्यात टाकणारा असाच आहे. युरोपीय समुदायातील एकंदर २७ देशांमध्ये चालू कॅलेन्डर वर्षातील ६ जून ते ९ जून या कालावधीमध्ये झालेल्या निवडणुकांदरम्यान उजव्या तसेच अति उजव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षांना अपेक्षेपेक्षाही किती तरी अधिक जनाधार व्यक्त झाला, मिळाला. समाजातील विविध स्तरांमध्ये अति उजव्या विचारप्रवाहाची अलीकडेच वाढत असलेली ही स्वीकारार्हता हा नेमका कशाचा परिपाक आहे, यांबद्दल सर्वत्रच प्रगट-अप्रगट विचारमंथन आताशा वेगाने आणि सघनपणे मूळ धरते आहे. सर्वसाधारणपणे ज्या मूल्यांचा अथवा भूमिकांचा परिपोष उजवी विचारसरणी हिरिरीने करते त्या मूल्यांपायी वैश्विक स्तरावर एकंदरीनेच अशांतता व अस्वस्थता येत्या काळात अधिक बळावणार तर नाही ना, याची चिंता आज व्यापक स्तरावर व्यक्त केली जाताना दिसते. उग्र राष्ट्रवाद, पुराणमतवाद, स्थितिशीलतेकडे कल, वांशिक एकात्मता जपण्याबाबतचा आग्रह, बहुसांस्कृतिकतेला विरोध, इस्लामविरोधी मानसिकता, समाजवादाप्रती नफरत, अन्य देशांमधून कारणपरत्वे येणाऱ्या स्थलांतरितांना कडवा विरोध, उदारमतवादी आर्थिक धोरणे... ही अति उजव्या मानसिकतेची व्यवच्छेदक लक्षणे गणली जातात. या विचारधारेला अधिकाधिक बळ असेच मिळत राहिले तर युरोपीय समुदायाच्या एकसंधतेला तडे जातील, अशी भीती देशोदेशींचे अभ्यासकच केवळ नव्हे तर राजकीय व्यवस्थेतील धुरीणदेखील व्यक्त करत आहेत. अति उजव्या विचारधारेबद्दल युरोपीय देशांमध्ये वाढणारे हे आकर्षण आणि त्या विचारसरणीचा काही घटकांकडून प्रकर्षाने केला जाणारा स्वीकार ही अलीकडे अवचितच उद्भवलेली लाट होय, असे मात्र म्हणता येणार नाही.

एकंदरीने युरोपातील चर्चाविश्वातच काही मूलभूत स्वरूपाचे बदल अलीकडील काळात क्रमाने साकारताना दिसतात. हा केवळ 'उजव्या' व 'डाव्या' अशा दोन विचारसरणींमधील मतभिन्नतेचा मुद्दा आता राहिलेला नाही. परंपराप्रियता उराशी जपत, जगभरात गेली सुमारे चार दशके नांदत आलेल्या उदारमतवादी वैचारिक भूमिकेला कडवा विरोध, असे या नवीन मानसिकतेचे अंतरंग रूप दिसते. डाव्या विचारसरणीबाबतचे आकर्षण युरोपातील अनेक देशांमध्ये आताशा उतरणीला लागलेले दिसते. डाव्या विचारधारेला विरोध आताशा आकार घेतो आहे तो अति उजव्या वैचारिक भूमिकेच्या मुशीतून. उदारमतवादाची कास धरत सकारात्मक भूमिकेतून जागतिकीकरणाला सामोरे जाण्याच्या आजवरच्या परिपाठामुळे देशोदेशींच्या समाजवास्तवात घडून आलेल्या सामाजिक स्थित्यंतरांबाबतची तीव्र प्रतिक्रिया या मानसिकतेच्या मुळाशी दिसते. पुराणमतवादाचा परिपोष करणाऱ्या मानसिकतेची सांगड व्यापक स्तरावर सवंग लोकप्रियता संपादन करून देणाऱ्या धोरणांशी घालून देत जागतिकीकरण आणि त्याच्या माध्यमातून साकारणाऱ्या सांस्कृतिक स्थित्यंतराचा मुकाबला निर्धाराने करण्याची कार्यपद्धती उजव्या व अति उजव्या विचारधारेच्या पाठीराख्यांकडून आताशा अवलंबली जाताना दिसून येते. 'भांडवलशाही' अथवा 'समाजवाद' यांसारख्या वैचारिक भूमिकांच्या सभोवती धोरणांची बांधणी करण्यापेक्षाही, काही युरोपीय देशांमधील राजकीय पक्ष अलीकडे, स्थलांतरितांना सामावून घेण्यास विरोध, बांधकाम क्षेत्रातील अरिष्ट, सत्ताधीशांकडून होत असलेले आर्थिक गैरव्यवस्थापन...यांसारख्या मुद्यांभोवती एकवटणाऱ्या लोकभावनांना जपत-जोपासत आपली प्रतिमा निर्माण करत असल्याचे चित्र दिसते.

उजव्या आणि/अथवा अति उजव्या विचारसरणीबाबत वाढत असलेले हे आकर्षण म्हणजे २१व्या शतकातील पहिल्या दशकाच्या उत्तरार्धापासून वैश्विक स्तरावर क्रमाक्रमाने अवतरत आलेल्या आर्थिक अरिष्टांची परिणती होय, अशी उपपत्ती काही अभ्यासकांकडून मांडण्यात येते. वाढती बेरोजगारी आणि आर्थिक वाढविस्ताराचा मलूल होत चाललेला वार्षिक सरासरी दर या दोहोंपायी सघन बनत असलेल्या आर्थिक असुरक्षिततेची स्वाभाविक प्रतिक्रिया, असेही या वास्तवासंदर्भातील एक स्पष्टीकरण काही अभ्यासक देतात.

**खापर जागतिकीकरणाच्या माथी**

साधारणपणे १९८०च्या दशकापासून जगभरात सर्वत्रच कमी-अधिक प्रमाणात उगम पावलेल्या जागतिकीकरणाच्या माथ्यावर या सगळ्याचे खापर फोडण्याचा

परिपाठ देशोदेशींच्या उजव्या तसेच अति उजव्या विचारसरणीचे पक्ष सरसहा अवलंबताना दिसतात. मुख्य समस्या आहे ती बेरोजगारीची. तिचे स्वरूप आहे मुळात आर्थिक. परंतु, तिच्यावर परिणामकारक उपाय शोधला न जाण्यामुळे तिचे रूपांतर घडून येते सामाजिक अशांततेमध्ये. देशामध्ये मुळातच असणारी बेरोजगारी, गुन्हेगारी यांत भर पडण्याबरोबरच, बाहेरून आलेल्या स्थलांतरितांपायी देशी अर्थव्यवस्थेची दुरवस्था अधिकच गहिरी बनेल, अशी भीती घालत उजव्या विचारसरणीचे घटक देशवासियांच्या मनात स्थलांतरितांबद्दल अधिकच रोष उत्पन्न करत राहतात. त्याच्याच जोडीने जागतिकीकरणाबाबतदेखील विरोधी भावभावना देशातील नागरिकांमध्ये बळावत राहावी, याच दिशेने उजव्यांचा प्रयत्न जारी राहतो. उदारीकरणाद्वारे देशी अर्थव्यवस्थेमध्ये प्रवेशणारी आयात, स्थलांतरित श्रमिकांच्या माध्यमातून प्रवेशणारी बहुसांस्कृतिकता यांच्याप्रती नकारात्मक भावभावनांना खतपाणी उजव्या विचारसरणीचे घटक घालत राहतात. देशी अर्थव्यवस्थेभोवती संरक्षक धोरणांची तटबंदी उभारण्याबरोबरच उग्र राष्ट्रवादी प्रेरणा चेतवणाऱ्या उजव्या/अति उजव्या विचारधारांना या प्रक्रियेद्वारे उत्तरोत्तर बढावाच मिळत राहतो.

ही सगळी प्रक्रिया नीट समजावून घ्यावयास हवी. जागतिकीकरणाच्या माध्यमातून जगभरातील देशसमूहांची सरमिसळ वेगवान बनत असल्याचे वास्तव आपण सगळेच अनुभवतो आहोत. त्या प्रक्रियेद्वारे देशोदेशींच्या स्थानीय समाजांत घडून येत असलेल्या सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक-वांशिक घुसळणीला उजव्या विचारसरणीकडून जो प्रतिसाद दिला जातो आहे, त्याचे हे सारे कवडसे होत. जगभरातील देशांमध्ये कार्यरत असणाऱ्या विविध बाजारपेठांची परस्परांमध्ये सघन गुंफण, हे 'जागतिकीकरण' या संकल्पनेचे व्यवहारातील रूप ठरते. वाढत्या व्यापाराच्या हातात हात घालूनच भांडवल आणि श्रमिक यांचेही देशांतर जागतिकीकरणाच्या प्रवाहाद्वारे गती पकडते. त्यांतून स्वाभाविकच उद्‌भवणारे स्थलांतर हा या सगळ्यांत मुख्य कळीचा मुद्दा शाबीत होतो आहे.

भांडवलाला जात, वर्ण, पंथ, विचारसरणी अगर देश-वेष नसतो. त्यांमुळे भांडवलाच्या स्वागतासाठी सगळेच लाल गालिचे अंथरतात. परंतु, श्रमिकांचे अथवा मनुष्यबळाचे मात्र तसे नाही. एखादा माणूस ज्या वेळी दुसऱ्या देशात नोकरी अगर व्यवसायासाठी स्थलांतर करतो त्या वेळी आपल्याबरोबर तो त्याची भाषा, संस्कृती, परंपरा, श्रद्धा, जाणिवा, वेष, आहारविषयक सवयी, धर्मनिष्ठा, संस्कार यांचे गाठोडे घेऊनच यजमान देशात प्रवेशतो. आता, जागतिकीकरणाच्या माध्यमातून ही प्रक्रिया

मोठ्या प्रमाणावर व सातत्यपूर्ण बनल्याने युरोपातील अनेक देशांमधील कॅथलिक विचारसरणीचे अनुयायी असणाऱ्या समाजसमूहांची आजवरची एकसंध अशी सामाजिक–सांस्कृतिक–भाषिक वीण सैल बनू लागली. मोठ्या प्रमाणावर आपल्या देशात प्रवेशणाऱ्या अशा स्थलांतरितांपायी आपल्या राष्ट्राची आत्मखूण झाकोळली जाण्याबरोबरच आपल्या परंपरेवरही त्यांपायी आघात होत आहेत, अशी भावना स्थलांतरितांच्या वाढत्या संख्येपायी स्थानिक जनसमूहांच्या मनात जागावी, यात अस्वाभाविक अथवा अनैसर्गिक असे काहीच नाही.

परंतु, मुदलातच पुराणमतवादी मानसिकता जोपासणाऱ्या आणि म्हणूनच कोणत्याही प्रकारच्या स्थित्यंतरांना उमदेपणाने सामोरे जाण्याबाबत नाखूष असणाऱ्या उजव्या विचारसरणीचे पाठीराखे नेमके याच गोष्टींचे भांडवल करत असल्याचे चित्र विविध युरोपीय देशांमध्ये दिसते आहे, असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे निरीक्षण सांगते. केवळ इतकेच नाही तर, जगभरातच आता जे नवनवीन विचारप्रवाह संक्रमित होत आहेत त्यांपैकी काहींनादेखील उजव्या/अति उजव्या विचारधारेचा कडवा विरोध आहे. भिन्न लैंगिकतेबाबत अथवा समलैंगिकतेबाबत उदार दृष्टिकोन व त्याचे समर्थन, निरीश्वरवाद, इस्लामबाबतची भूमिका, पर्यावरणाबाबतची वाढलेली सार्वत्रिक संवेदनशीलता, कुटुंबसंस्थेसंदर्भात नव्याने अंकुरत असलेल्या धारणा.. यांसारख्या, ‘डाव्या’ विचारसरणीच्या सांस्कृतिक खुणांची प्रतिके गणल्या जाणाऱ्या, नवप्रवाहांपायी आपली परंपरा धोक्यात येत असल्याचा युक्तिवाद त्या विरोधाच्या मुळाशी दिसतो. विशेषत:, इस्लामच्या वाढत्या उदयापायी पारंपरिक अशा एकसंध ख्रिस्ती कॅथलिक समाजरचनेचा ढाचा विस्कळीत होणे, हा युरोपातील अनेक देशांमधील राजकीय व्यासपीठांच्या लेखी सर्वांत मोठा धोका गणला जातो.

**राजकीय व्यवस्थाही कारणभूत**

खास करून, पश्चिम युरोपातील काही देशांमध्ये स्थलांतरितांपायी लक्षणीय अशी सामाजिक–सांस्कृतिक घुसळण वेग पकडत असल्याचे अलीकडील काळात दिसून आले. फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, ऑस्ट्रिया आणि स्वीडनसारख्या देशांमधील इस्लामवंशियांच्या संख्येमध्ये चालू शतकाच्या सुरुवातीनंतर एकदम मोठी वाढ घडून आल्याचे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. हे स्थलांतरित स्थानीय संस्कृतीशी एकरूप होण्याबाबत खळखळ करत असल्याने पारंपरिक युरोपीय संस्कृतीविषयक विचारप्रणालीच्या पुढ्यात आव्हान उभे राहत असल्याचा पवित्रा उजवे विचारसरणीचे पाठीराखे घेताना दिसतात. तर, स्थलांतरितांपायी युरोपीय देशांमधील गुन्हेगारीमध्येही

वाढ घडून येत असल्याचा दावा करत, हा, एक प्रकारे, उभ्या युरोपवरील हल्लाच असल्याची ओरडही दुसरीकडून करण्यात येते.

जागतिकीकरणाच्या रेट्यापायी उद्‌भवत असलेल्या सामाजिक-सांस्कृतिक समस्यांची भूमी उजव्या तसेच अति-उजव्या विचारसरणीची बीजे रुजण्यासाठी अनुकूल शाबीत होत असली तरी, उजव्या विचारसरणीला समाजमानसामध्ये वाढता अवकाश प्राप्त होण्यास युरोपातील अनेक देशांमधील प्रचलीत राजकीय व्यवस्थादेखील तितकीच कारणभूत ठरत असल्याचे अभ्यासकांचे विश्लेषण आहे. डाव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षांमधील चिरफाळ्या आणि फाटाफूट एकीकडे तर, मुक्त अर्थकारणाची तळी उचलून धरणाऱ्या युरोपातील देशोदेशींच्या नवउदारमतवादी सत्ताधीशांना, त्यांपायी आर्थिक आघाडीवर निर्माण होत असलेल्या समस्या हाताळण्यात येत असलेले अपयश दुसरीकडे या कात्रीद्वारे उजव्या व अति उजव्या विचारसरणीला तिथे अवकाश प्राप्त होत असल्याचा अनुभव आहे. एकजुटीच्या अभावापायी उजव्या अगर अति उजव्या विचारसरणीला डाव्या पक्षांकडून एकमुखी व तगडा विरोध उभा राहताना दिसत नाही. २००८ सालापासून उद्‌भवलेल्या आर्थिक अरिष्टांचा मुकाबला करण्यात नवउदारमतवादी आर्थिक धोरणांच्या पाठीराख्यांना येत आलेले अपयश आणि समाजवादी विचारधारेबद्दल एकंदरच ओहोटीला लागलेले आकर्षण या दोहोंपायी उजव्या विचारधारेला आज युरोपातील विविध देशांत बाळसे चढताना दिसते आहे.

आर्थिक धोरणांबाबत उदारमतवादी भूमिका अवलंबणाऱ्या उजव्या विचारसरणीच्या सत्ताधीशांच्या विरोधात रान उठवण्यासाठी युरोपीय देशांत अंग धरत असलेल्या अति उजव्या शक्ती, आर्थिक पुनर्रचनेचे चटके सोसावे लागलेल्या व आजही चटके सोसत असणाऱ्या समूहांच्या व्यथांना तोंड फोडण्याच्या मिषाने आपल्या पाठीशी जनमत संघटित करताना दिसतात. या पवित्र्याचे विविध अवतार वेगवेगळ्या युरोपीय देशांमध्ये आकार घेत राहतात. युरोपीय समुदायाने अंगीकारलेली काही धोरणे आणि/अथवा प्रवर्तित केलेली काही एक संस्थाप्रणाली यांना विरोध करण्यापासून ते 'युरोपीय समुदाय' नावाचे आकारास आणले गेलेले व्यासपीठच मुदलात अवांछनीय होय, अशा टोकापर्यंत त्या पवित्र्याचे विभ्रम दिसतात. परिणामी, एक आर्थिक तसेच राजकीय व्यवस्थात्मक प्रयोग म्हणून ज्या युरोपीय समुदायाचे प्रवर्तन झाले त्याच्या एकसंधतेलाच हादरे बसून तडे जाण्याची भीती उजागर बनते, अशी भीती अभ्यासक आताशा व्यक्त करत आहेत.

या सगळ्या अशा परिस्थितीवर कशा प्रकारचा तोडगा काढता येईल या दिशेने युरोपीय देशांमधील विविध व्यवस्थांमध्ये चिंतन-मंथन आता वेगाने मूळ धरते आहे. उजव्या विचारसरणीच्या मुशीतून निर्माण झालेल्या मुक्त बाजारपेठीय अर्थकारणाचे चटके सोसणाऱ्या समाजसमूहांच्या व्यथा-वेदनांवर सवंग लोकप्रियताप्रवण उपाययोजनांद्वारे फुंकर घालण्याने हाती काहीच लागणार नाही, याची अटकळ आता सगळेच हळूहळू बांधायला लागलेले दिसतात. डाव्या विचारसरणीबाबतचे उतरणीला लागलेले आकर्षण आणि उजव्या विचारधारेने अवलंबलेल्या आर्थिक धोरणांपायी मंदी, बेरोजगारी यांसारखी उभी ठाकलेली चिवट आव्हाने या दोहोंपायी अति उजव्या विचारप्रणालीला युरोपच्या भूमीवर अंकुरण्यास वाव मिळतो आहे. डाव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षांची तसेच व्यासपीठांची पुनर्बांधणी आणि त्यांद्वारे अति उजव्या विचारधारेला संघटित विरोध एकीकडून करत असतानाच, मुक्त बाजारपेठीय अर्थकारणाचे विद्यमान प्रारूप जणू काही अपरिवर्तनीयच होय, या वैचारिक बंदिस्तपणापासून सुटका करून घेण्यासाठी नेटाने प्रयत्नशील बनण्याचा पर्याय गांभीर्याने चोखाळल्यास अति उजव्या विचारधारेच्या विस्तारत्या पायबंद बसू शकेल, अशी शक्यता नक्कीच संभवते.

# युरोप-४

## युरोपातील 'उजव्यां'मध्ये छटा तरी किती...?

युरोपीय भूमीवर उजव्या विचारधारेच्या राजकीय पक्षांचे अस्तित्व तेथील राजकीय व्यवस्थेमध्ये निरनिराळ्या सामर्थ्यानिशी साधारणपणे १९७०च्या दशकाच्या अखेरीपासून जाणवू लागले, असे या प्रक्रियेचा मागोवा राखणाऱ्या अभ्यासकांचे निरीक्षण आहे. काळाच्या त्याच टप्प्यावर या विचारसरणीला युरोपातील विविध देशांमध्ये निरनिराळ्या प्रमाणात जनाधारही वाढू लागल्याचे निवडणुकांच्याद्वारे स्पष्ट होऊ लागले. या विचारसरणीला 'उजवी' असे ढोबळ विशेषण जरी आजवर सैलपणे सरसकट जोडले जात आलेले असले तरी, त्या 'उजवेपणा'तदेखील किमान तीन तरी छटा आज पुढ्यात अवतरतात. 'उजवे', 'कडवे उजवे' आणि 'अति उजवे', अशा तीन उपगटांत उजव्या विचारसरणीचा युरोपीय मोठा गट सर्वसाधारणपणे विभागता येईल अथवा विभागला जातो. 'उजवे'पणाच्या छटांनुसार आणि/अथवा 'उजवे'पणाच्या सघनतेनुसार हे वर्गीकरण व्यवहारात मानण्यात येते.

या छटांना निरनिराळ्या देशांमध्ये, युरोपात, वेगवेगळी संबोधनेदेखील बहाल केलेली आढळतात. विविध संबोधनांचा आशय व त्यांनुसार निर्देशित होणारी 'उजवे'पणाची सखोलता-सघनता युरोपीय समुदायातील निरनिराळ्या देशांमध्ये एकसारखीच आहे, असे छातीठोकपणे सांगता येणे अवघडच आहे. काही ठिकाणी तर 'उजवे'पणाची व्याख्या व लक्षणेदेखील निराळी दिसतात. 'प्रतिक्रियात्मक उजवे', 'राष्ट्रवादी उजवे', 'बहुजनवादी उजवे' अशा प्रकारची नावेदेखील देशोदेशींच्या उजव्या विचारसरणींना अथवा त्यांचे घटक असणाऱ्या गटोपगटांना मिळालेली दिसतात. हे प्रकार 'उजवे' व 'कडवे उजवे' या दोन गटांच्या जवळपास अथवा, प्रसंगी, त्यांच्या छेदसंचात नांदताना दिसतात. या छटा सर्वत्र व सार्वकालिक आहेत, असेही काही ठाम म्हणता येत नाही. एकंदरीनेच, युरोपच्यासंदर्भात 'उजवी

विचारप्रणाली' ही एक 'सबगोलंकार' अशी मोकळी–ढाकळी संज्ञा असल्याचे तेथील अभ्यासकदेखील मान्य करतात. ही सगळी व्यामिश्रता नीट समजावून घ्यावयास हवी.

या संदर्भात एक बाब, संबंधित संशोधनपूत लेखनाचे ढोबळ निरीक्षण केल्यानंतर प्रकर्षाने जाणवते. ती अशी की, 'उजवे', 'कडवे उजवे' आणि 'अति उजवे' हे उजव्या विचारसरणीचे तीन उपगट म्हणजे उजव्या वृत्ती–प्रवृत्तीचे तीन आयाम होत. किंबहुना, हे तीन आयामदेखील पुन्हा संपूर्णत: पृथक आहेत, असेही म्हणवत नाही. त्या त्या काळातील परिस्थितीनुसार, त्या त्या स्थळी उद्‌भवलेल्या समस्यांच्या स्वरूपानुसार, वेळोवेळी समाजमानसात उसळणाऱ्या भावनिक हेलकाव्यांनुसार मुळातील 'उजवी' विचारसरणीच 'कडवी उजवी' अथवा 'अति उजवी' या तिच्या अन्य आयामांमध्ये परावर्तित अथवा रूपांतरित होताना दिसते, असाही अभ्यासकांचा दावावजा प्रतिपादन आहे. लोकशाही राज्यप्रणाली, उदारमतवादी अर्थव्यवहार, शासनसंस्थेची अधिमान्यता यांसारख्या मूल्यांसंदर्भात उजव्या विचारसरणीचे सत्तारूढ शासकांशी कशा प्रकारचे संबंध नांदताना दिसतात त्यांवरही त्यांना 'कडवे उजवे' म्हणायचे, 'प्रतिक्रियावादी उजवे' म्हणायचे की 'बहुजनवादी उजवे' म्हणायचे, हे ठरत असल्याचे व्यवहारात दिसून येते. सर्वसाधारण चित्र असे दिसून येते की, युरोपीय समुदायातील उजव्या विचारसरणीचे जे राजकीय गट अथवा पक्ष देशोदेशींच्या राजकीय व्यवस्थेमध्ये कमी–अधिक ताकदीने सक्रिय आहेत त्यांची आणि 'बहुजनवादी उजवे' (पॉप्युलिस्ट रायटिस्ट्स्) असे ज्यांना संबोधण्यात येते त्यांची गाभामूल्ये जवळपास एकसमान असल्याचे दिसून येते.

जागतिकीकरणाला विरोध, परदेशस्थ स्थलांतरितांना आपल्या देशात प्रवेश देण्यास/ आपल्या समाजात सामावून घेण्यास नकार अथवा नापसंती, बहुसांस्कृतिकतेबाबत नफरत अथवा त्या भूमिकेवर टीका आणि मुख्य म्हणजे 'युरोपीय समुदाय'नामक व्यवस्थेलाच विरोध ही, अगदी ढोबळ मानाने, उजव्या विचारप्रणालीस अनुसरणाऱ्या राजकीय पक्षांची मूल्यव्यवस्था अथवा त्यांच्या कार्यप्रणालीमागील मार्गदर्शक तत्वे म्हणता येतील. याच मूल्यसंचयात आणखी तीन कलमांचा अंतर्भाव होऊन जी मार्गदर्शक तत्वे अगर भूमिका उभरून येते तिचा अंगीकार करणाऱ्या उजव्यांचे वर्णन युरोपातील अभ्यासक 'बहुजनवादी उजवी विचारसरणी,' अशा शब्दांत करतात. जागतिकीकरण, स्थलांतरितांपायी उद्भवणाऱ्या समस्या, आर्थिक बाबींसंदर्भातील उदार धोरण यांपायी निर्माण होणाऱ्या समस्यांसंदर्भात

मुख्यत: जनसामान्यांची बाजू अग्रहक्काने उचलून धरणे, प्रस्थापितांना व प्रस्थापित व्यवस्थेला विरोध करणे आणि अभिजनांच्या वर्चस्वाला नकार देणे अथवा त्यांविरुद्ध आवाज उठवणे या तीन भूमिकांचा अंगीकार करणारे राजकीय पक्ष अथवा विचारप्रणाली युरोपात 'बहुजनवादी उजवे' म्हणून ओळखले जातात. तर, उजव्या विचारप्रणालीच्या मूळ मूल्यसंचितालाच, स्थलकालपरत्वे, अधिक उग्र रंगरूप लाभले की त्या विचारप्रणालीला 'कडवी उजवी विचारसरणी' असे अभिधान लाभते. नवराष्ट्रवादी मूल्याचा उगम, सामाजिक बाबींसंदर्भात परंपरावादाचा सूर आळवणे आणि आर्थिक राष्ट्रवादाच्या भूमिकेचा अंगीकार व पाठपुरावा करणे ही कडव्या उजव्या विचारप्रणालीची मुख्य चिन्हे अगर लक्षणे अगर वैशिष्ट्ये गणली जातात.

**'उजवी'कडून 'अति उजवी'कडे...**

आता, या टप्प्यावर इथे एक मोठे वळण आहे आणि तेही अतिशय सूक्ष्म. 'कडवे उजवे' आणि 'अति उजवे' या, उजव्या विचारसरणीतीलच दोन आयामांदरम्यानची सीमारेषा या वळणावर विलक्षण पुसट दिसते. राष्ट्रीय संस्कृती आणि राष्ट्राची आत्मखूण जपण्याबाबतचा कठोर कटाक्ष, अर्थकारणातील अति उदारमतवादाबाबत प्रतिकूलता आणि एकंदरीनेच एकाधिकारशाही अथवा हुकुमशाही प्रवृत्ती जपणाऱ्या शासनसंस्थेकडे कल अशी मूल्यसंपदा प्रिय वाटणाऱ्या 'अति उजव्या' विचारप्रणालीचा उगम याच वळणावर कधी कडव्या उजव्या विचारधारेमधून तर कधी तिला समांतर पद्धतीने अवचितच घडून येत असल्याचे चित्र युरोपात काही देशांमध्ये आढळून आलेले आहे. अर्थात, हे प्रतिपादनदेखील निरपवाद गणता येत नाही. काही वेळा परिस्थितीच असे रंगरूप धारण करते की, कडव्या उजव्या विचारसरणीचे रूपांतर अथवा अवस्थांतर अति उजव्या विचारधारेमध्ये, त्या परिस्थितीच्या दबावाखाली, घडून येते. 'कडवी उजवी विचारधारा' आणि 'अति उजवी विचारधारा' या दोहोंमध्ये मुख्य फरक पडतो अथवा दिसतो तो या दोन्ही विचारसरणींचा शासनसंस्थेबाबतचा जो दृष्टिकोन प्रगट होतो त्यांद्वारे. सत्तारूढ शासनसंस्थेशी कडवे उजवे निदान कार्यकारी स्वरूपाचा संवाद तरी जपतात, अति उजवे मात्र शासनसंस्थेच्या अधिमान्यतेबाबतच शंका उपस्थित करताना दिसतात.

नाव कोणतेही धारण केले अथवा दिले गेले – प्रतिक्रियावादी उजवे, बहुजनवादी उजवे, कडवे उजवे, अति–उजवे – तरी या सगळ्या छटा 'उजव्या' या एकाच विचाररंगाच्या विरळ–गडद–अति गडद छटा होत हे नि:संशय. फॅसिस्ट प्रवृत्तींच्या आक्रमक आगेकूचीमुळे दुसऱ्या महायुद्धामध्ये पोळून निघालेल्या युरोपच्या भूमीवर,

साधारणपणे, १९७०च्या दशकाच्या अंतिम पर्वापासून क्रमाक्रमाने उजवी विचारसरणी कशामुळे मूळ धरू लागली, यांबद्दल अनेक अभ्यासकांच्या पोटी सचिंत जिज्ञासा साठते आहे. या विचारसरणीला फोफावण्यास अवकाश देण्यामध्ये, विशेषत:, १९८०च्या दशकाच्या पूर्वार्धापासून जगभरातच गतिमान बनलेले आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, व्यापारसंलग्न प्रवाह प्रकर्षाने सक्रिय आहेत, यांबाबत अभ्यासकांमध्ये आता जवळपास एकमत झालेले दिसते. प्रथम 'उजव्या' व आता 'अति-उजव्या' विचारसरणीची आगेकूच युरोपातील विविध देशांच्या राजकीय पक्षव्यवस्थेमध्ये घडून येण्यामागे विविध प्रवाहांचा एक विशाल आणि तितकाच गुंतागुंतीचा पट विणला गेलेला दिसतो. त्या पटाचे ताणेबाणे हळुवारपणे नीट उलगडल्याखेरीज अति-उजव्यांच्या अलीकडील जोरदार मुसंडीची संगती लागणे अवघड ठरेल व ठरते.

दुसऱ्या महायुद्धात होरपळलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थांची पुनर्उभारणी करण्याच्या आव्हानास सामोरे जाण्याच्या पर्वादरम्यान, एकंदर सर्व जगभरातच, समाजवादी व नियोजनप्रधान अशा डावीकडे झुकणाऱ्या शासनसंस्थाप्रणीत अर्थविकासाची तळी उचलून धरणाऱ्या विचारधारेला बळकटी मिळून तिच्याशी बांधिलकी मानणारे राजकीय प्रवाह देशोदेशी सत्तेवर आले. १९५०सालाच्या आगेमागे साकारलेल्या या प्रतिमानाची सद्दी पुढील जवळपास तीन दशके सर्वत्र अप्रतिहत चालू राहिली. मात्र, मुख्यत: केंद्रीय नियोजनप्रधान अशा शासनसंस्थाप्रणीत अर्थविकासप्रणालीच्या त्या सद्दीदरम्यान देशोदेशींच्या अर्थकारणात ज्या त्रुटी, समस्या व अडचणी निर्माण झाल्या त्यांचे समाधानकारक निराकरण करण्यात शासनसंस्थांना अपयश येऊ लागले. वाढती लोकसंख्या, रोजगारांची वाढीव मागणी, रुंदावणारी विषमतेची दरी अशा विविध आव्हानांना तोंड देत अर्थविकासाची गती दमदार राखणे शासनसंस्थेला दुष्कर ठरू लागले. त्याचा मोठा प्रतिकूल असर झाला तो शासनसंस्थेच्या पुरवठाक्षमतेवर.

**परिणती जागतिकीकरणाच्या विषम लाभप्रदतेची**

समाजवादी, डाव्या विचारप्रणाली प्रेरित शासनसंस्थेच्या पुढाकारातून साकारणाऱ्या आर्थिक विकासाच्या आगेकूचीचा दर लडखडू लागल्याने, साधारणपणे, १९९०च्या दशकाच्या प्रारंभापासूनच युरोपातील अनेक देशांमधील सामाजिक सुरक्षा कवच क्रमाक्रमाने विरळ बनू लागले. निर्वाहवेतन, मोफत अगर भरघोस सवलतीने वैद्यकीय सेवा, विम्याचे संरक्षण, बेरोजगार भत्ते... यांसारख्या नानाविध कल्याणकारी सुविधांना, तुटीचा बोजा माथ्यावर वाढणाऱ्या शासनसंस्थांकडून कात्री लावली जाऊ लागली. जर्मनी, ग्रीस, स्पेन यांसारख्या देशांमधून त्यामुळे नागरिकांच्या उत्स्फूर्त, आक्रमक

व संघटित अशा प्रतिक्रिया रस्त्यांवरील निदर्शनांच्या माध्यमातून प्रगट होऊ लागल्या. १९८०च्या दशकाच्या मध्यापासून वैश्विक स्तरावर गतिमान बनलेल्या जागतिकीकरणाच्या वाऱ्यांद्वारे देशोदेशींच्या बाजारपेठांची सघन गुंफण घडून येण्याच्या प्रक्रियेने वेग पकडला. वाहतूक तसेच दळणवळणाच्या तंत्रज्ञानात, समांतर पद्धतीने, प्रचंड सुधारणा घडून आल्याने प्रवास, वाहतूक, देवाणघेवाण, संपर्क कमालीचा सुकर, वेगवान आणि मुख्यत: तुलनेने स्वस्त बनला. परिणामी, वैश्विक स्तरावरील पुरवठासाखळ्यांचे पुनर्आलेखन व पुनर्निर्धारण घडून येऊ लागले.

साहजिकच, तंत्रज्ञानाचे आणि उत्पादनकेंद्रांचे पुनर्स्थानांकन त्यांमुळे सुरू झाले. भांडवल आणि श्रमशक्तीच्या आंतरराष्ट्रीय स्थलांतराला वेग आला. जागतिकीकरणाच्या माध्यमातून परस्परांत घनिष्ठ गुंफण घडून आल्यामुळे देशोदेशींच्या उद्योगव्यवसायांना जागतिक पातळीवरील स्पर्धेचा सामना करणे क्रमप्राप्त होऊन बसले. आपल्या उत्पादनाचा दर्जा अव्वल राखणे आणि त्यांचे बाजारभाव स्पर्धात्मक राखणे उद्योगांना अनिवार्य ठरू लागले. साहजिकच, ज्या देशात अथवा ज्या भूभागावर उत्पादन खर्चात बचत साध्य होईल तिथे उद्योगधंदे उभारण्याची कार्यपद्धती स्थिरावली. एका देशातून दुसऱ्या देशांत उद्योगव्यवसायांच्या आस्थापनांचे देशांतर हा जणू काही नियमच बनला. उद्योग, औद्योगिक गुंतवणूक आणि उत्पादन व पुरवठाकेंद्रे यांच्या स्थलांतराद्वारे साहजिकच रोजगारांच्या देशांतरानेही वेग पकडला... आणि जागतिकीकरणाचे व्यावहारिक चटके बसायला नेमके हेच कारण ज्वलंत व दाहक ठरले

ज्या ज्या देशांतून उत्पादनाची केंद्रे अन्य देशांमध्ये स्थानांतरित झाली त्या त्या अर्थव्यवस्थांमध्ये बेरोजगारीचा प्रश्न एकदम उसळी मारून पृष्ठभागावर आला. युरोपातील अनेक देशांमध्ये त्यांपायी सामाजिक अस्वस्थतेचा उद्‌भव एकदम व्यापक प्रमाणावर घडून आला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग पकडून दशकभराचा कालावधी उलटतो न उलटतो तोच १९८९ मध्ये एक आणि १९९० साली एक असे दोन मोठे उत्पात घडून आले. चीनमधील तिआनमेन चौकात चिनी तरूणांचा उद्रेक उसळून आला १९८९ साली आणि १९९० मध्ये सोव्हिएत संघराज्याचे विघटन झाले. पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत संघराज्याचे घटक असणाऱ्या परंतु विघटनांती नवस्वतंत्र झालेल्या राष्ट्रांमध्ये एक नवीनच असंतोष मूळ धरू लागला. सोव्हिएत संघराज्याचे विघटन घडून येऊन बाहेर पडलेल्या ज्या राष्ट्रांना त्या प्रक्रियेदरम्यान त्यांची काही भूमी गमावणे अथवा खंडित भूभाग स्वीकारणे भाग पडलेले होते ती नवस्वतंत्र राष्ट्रे असंतुष्ट व पोटात खदखद वागवणारी अशीच राहिली. सोव्हिएत संघराज्याच्या

विलिनीकरणाद्वारे जे देश नवस्वतंत्र बनले त्यांतील बहुतेक देश पूर्व युरोपातील होते व आहेत. आणि नेमक्या याच देशांमध्ये आता अति–उजव्या विचारसरणींना वाढता जनाधार लाभतो आहे, हा केवळ योगायोग म्हणता येत नाही.

इस्लामधर्मी दहशतवाद्यांनी २००१ सालातील ११ सप्टेंबर रोजी जागतिक व्यापार संघटनेच्या अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे असलेल्या जुळ्या मनोऱ्यांवर आत्मघातकी हल्ला केल्यापासून जगभरात इस्लामधर्मी दहशतवादाचे नवीनच पर्व उग्र बनू लागले. अमेरिकेच्या पाठोपाठच २००४ सालातील मार्च महिन्याच्या ११ तारखेसच स्पेनची राजधानी असलेल्या माद्रिद या शहरातील चार उपनगरीय रेल्वेगाड्यांमध्ये इस्लामी दहशतवाद्यांनी एकंदर १० बॉम्बस्फोट घडवून आणले. त्याच्याच पुढील वर्षी, म्हणजे, २००५ सालातील जुलै महिन्याच्या सात तारखेस लंडनमधील शहरी वाहतूक व्यवस्थेमध्ये इस्लामी दहशतवाद्यांनी भुयारी रेल्वे तसेच बसमध्ये एकंदर चार आत्मघातकी बॉम्बहल्ले घडवून आणून हलकल्लोळ उडवून दिला. इस्लामी दहशतवादापायी निरनिराळ्या देशांमध्ये उसळू लागलेल्या अशा आकांतांची परिणती, आपातत:, जगभरातच इस्लामी दहशतवादाविरोधी जनमानस संघटित होण्यात घडून येऊ लागली.

**स्थलांतरितांच्या विरोधाला धार्मिक किनार**

ही सगळी प्रक्रिया व मानसिकता एकीकडे क्रमाक्रमाने घनरूप धारण करत असतानाच, मुख्यत: सीरिया आणि त्याचबरोबर अफगाणिस्तान, लीबिया, सोमालिया, इराक जॉर्डन यांसारख्या देशांतील हिंसाचाराला विटून तिथून बाहेर पडणाऱ्या स्थलांतरितांनी युरोपीय देशांच्या किनाऱ्यांकडे धाव घेण्याला २०११ साली सुरुवात झाली. युरोपीय समाजवास्तवात सक्रिय असणाऱ्या उजव्या विचारसरणीचा कल, क्रमाक्रमाने परंतु ठळकपणे, अति–उजव्या विचारधारेकडे झुकण्यास या घटिताने अतिशय सघनपणे व ठोस रीतीने चालना पुरविली. या स्थलांतरितांपायी आपल्या देशातील रोजगार हिरावले जाण्याबरोबरच आपली सांस्कृतिक एकात्मताही आता धोक्यात येणार, या भयगंडाने व्यापलेली सर्वसाधारण युरोपीय मानसिकता त्या पर्वादरम्यान पार सैरभैर होऊन गेली. मुळात, २००८ साली उद्भवलेल्या वित्तीय अरिष्टापायी मलूल बनत चाललेला आर्थिक विकास, वाढती बेरोजगारी व अर्धबेरोजगारी, विरळ बनू लागलेले सामाजिक सुरक्षेचे कवच... अशा विविध कारणांनी युरोपीय समाजमानस कमालीचे अस्वस्थ होतेच. त्यांत नव्याने भर पडू लागली ती वाढत्या इस्लामी दहशतवादापायी फैलावणाऱ्या असुरक्षिततेची व अशांततेची.

या सगळ्यांतून, स्थलांतरितांच्या समस्येला, आपातत:, पदर जोडला गेला धार्मिकतेचा. सीरिया, इराक, अफगाणिस्तान यांसह अन्य देशांमधून युरोपच्या भूमीकडे धाव घेणाऱ्या स्थलांतरितांना सामावून घेणे आणि/अथवा आश्रय देणे म्हणजे इस्लामधर्मीय अतिरेक्यांचे संकटच जणू ओढवून घेण्यासारखे होय, असा युक्तिवाद युरोपीय समाजात मूळ धरू लागला. अमेरिका, स्पेन, ब्रिटन येथे इस्लामी दहशतवाद्यांनी घडवून आणलेल्या रक्तरंजित उपद्व्यापांच्या पार्श्वभूमीवर तो युक्तिवाद सपशेल बिनबुडाचाही म्हणता येईना. कोणाही इस्लामधर्मीयात एखादा अतिरेकी दडलेला असू शकतो, मग तो मुस्लिम स्थलांतरित असो अथवा फ्रेंच नागरिक असो, असा भयगंड खास करून फ्रेंच नागरिकांच्या मनात पक्के घर करून बसू लागला. फ्रान्सव्यतिरिक्त जर्मनी, स्पेन, इटली, ऑस्ट्रिया यांसारख्या पूर्व युरोपीय देशांमध्ये मुख्यत: इस्लामधर्मीय स्थलांतरितांना जो कडवा विरोध मुखर होऊ लागला तो सगळा याच पूर्वेतिहासाचा परिपाक ठरतो व ठरला.

मोठ्या प्रमाणावर युरोपीय भूमीकडे येणाऱ्या स्थलांतरितांना सामावून घेतल्यास अगर त्यांना आश्रय दिल्यास आपल्या राष्ट्राची आत्मखूण लोपून जाईल तसेच/अथवा आपल्या राष्ट्रीय मूल्यांचा यथावकाश लोप घडून येईल या भावनेने स्थलांतरितांविरोधात जी प्रतिकूल प्रतिक्रिया युरोपीय देशांमधून उमटली तिच्यातही दोन गट होते. 'राष्ट्र' या संकल्पनेच्या मुळाशी असणाऱ्या दोन भावभावनांच्या अधिष्ठानावर त्या दोन गटांची उभारणी झालेली होती व आहे. 'राष्ट्र' या संकल्पनेची उदार, व्यापक, सर्वसमावेशक व खुली धारणा मनीमानसी बाळगणारे नागरिक व त्यांचे गट आणि त्या उलट, 'राष्ट्र' या संकल्पनेचे बंदिस्त, वर्जनवादी आकलन असणारे नागरिक व त्यांचे गट या विभागणीमध्येच नेमकी युरोपातील अति-उजव्यांची रुजवण घडून आली. 'राष्ट्र' या संकल्पनेचे बंदिस्त, वर्जनवादी आकलन असणाऱ्या अति उजव्या विचारसरणीच्या, स्थलांतरितांना प्रवेश देण्यासंदर्भातील विरोधाला धार्मिकतेच्या जोडीनेच पुन्हा वांशिक आणि आर्थिक असे आणखी दोन उपपदर जोडले गेलेले दिसतात.

युरोपीय समुदायातील ज्या देशांमधील समाजांची जडणघडण एकवांशिक स्वरूपाची होती व आजही आहे अशा देशांमधील अति उजव्या विचारसरणीकडून होणाऱ्या स्थलांतरितविरोधाला सघन किनार लाभलेली होती ती वंशभेसळीच्या भीतीची. एकाच वंशाच्या, एकाच रक्ताच्या नागरिकांचे वास्तव्य बहुश: असलेले देश धास्तावलेले होते ते भिन्नवंशीय स्थलांतरितांपायी त्यांच्या समाजांची एकवंशीय

वीण उसवली जाण्याच्या संभाव्य धोक्यापायी. स्थलांतरित भिन्नवंशीय असल्यामुळे आपल्या एकवंशीय समाजामध्ये भेसळ निर्माण होऊन आपली संस्कृती व परंपरा लोप पावण्याच्या प्रक्रियेला गती येईल, ही दुसरी भीतीदेखील काही युरोपीय देशांमधील समाजांच्या पोटात दाटताना दिसली. स्थलांतरितांना सामावून घेण्याबाबतच्या अति उजव्यांच्या विरोधाला जी आर्थिक किनार आहे तिचा संबंध जागतिकीकरणाद्वारे जगभरातील पुरवठासाखळ्यांमध्ये घडून आलेल्या भौगोलिक बदलांशी आहे. ज्या युरोपीय देशांमधील उद्योगधंद्यांनी स्थलांतराचा पर्याय अंगीकारत अन्य देशांच्या भूमीवर आपला कारभार थाटला अशा देशांमध्ये उद्योगांच्या स्थानांतरापायी मुळातच बेरोजगारीचा प्रश्न उग्र बनलेला होता.

रोजगाराच्या ज्या काही संधी, मग, अशा देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये उपलब्ध होत असत त्या पदरात पाडून घेण्याबाबत, देशात नव्यानेच प्रवेशलेल्या स्थलांतरितांपायी, देशी उमेदवारांना अधिकच तीव्र स्पर्धेला तोंड देणे भाग पडावे, हे मग स्वाभाविकच ठरले. त्यांमुळे, बाहेरून येणारे हे स्थलांतरित आमच्या रोजगारावर घाला घालत आहेत, हे अति उजव्यांचे कथन आकर्षक वाटू लागले आणि पटूही लागले. विशेषत:, फ्रान्समध्ये हे कथन अधिकच प्रकर्षाने घुमू लागले. फ्रान्समधील बेरोजगारी, असुरक्षितता, समाजव्यवहारात घडणाऱ्या काही अनुचित बाबी... अशा सगळ्यांचे खापर स्थलांतरितांवर फोडले जाऊ लागले. परदेशस्थ स्थलांतरित आणि त्यांचे कुटुंबीय यांना पुरवाव्या लागणाऱ्या कल्याणकारी सुविधांपायी व्यय होणाऱ्या निधीमुळे सरकारी तिजोरीतील तूट वाढत चाललेली आहे, असाही सूर मग आळवला जाऊ लागला.

फ्रान्सच्या तुलनेत ब्रिटन आणि स्पेनमध्ये, निदान प्रारंभी तरी, अति उजव्या विचारांचे आकर्षण स्थानिकांना त्या मानाने खूपच कमी होते. परंतु, आर्थिक अरिष्टाची झळ अधिक तीव्र बनली की अति उजव्या विचारसरणीच्या पाठीशी जनाधाराचे वाढते बळ एकवटू लागते या वास्तवाची काही चिन्हे ब्रिटनमध्ये अलीकडील काळात झालेल्या काही स्थानिक निवडणुकांमध्ये स्पष्टपणे दिसून आली. जागतिकीकरणामुळे बदललेल्या पुरवठासाखळ्यांपायी ज्यांच्या रोजगारांवर थेट गदा आली अशा, समाजातील अल्पकुशल, श्रमिक वर्गांमधील घटकांकडून स्थलांतरितांविरुद्ध कडक भूमिका स्वीकारणाऱ्या अति उजव्या विचारसरणीबाबत अनुकूल मानसिकता निर्माण होत असल्याचे चित्र तिथे दिसून आले. तर, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची प्रतिकूल निष्पत्ती ज्या समाजघटकांच्या वाट्याला अजिबातच आली नाही; किंबहुना,

जे समाजघटक त्या प्रक्रियेचे लाभार्थीच ठरत आले (उदाहरणार्थ, मध्यमवर्ग व उच्च विद्याविभूषित समाजगट) अशा समाजस्तरांमधून मात्र अति उजव्या विचारसरणीबाबत प्रतिकूल मानसिकता वसत असल्याचे चित्र ब्रिटनमध्ये दिसून येते... छटा कोणतीही असली तरी, एकंदरीनेच फैलावणाऱ्या या उजव्या विचारसरणीचा सामना कसा करावा, हा विचार युरोपातील सगळ्यांच मध्यममार्गी जनसमूहांना आजमितीस घेरून उरलेला आहे, हे मात्र खरे!

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**